❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. ०७ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २२३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# माझी नार्को टेस्ट करा : बावनकुळे

### मनोज जरांगेंच्या आरोपांवर बावनकुळेंचे प्रत्युत्तर, जात पडताळणी समितीच्या अधिकारांवरही दिले स्पष्टीकरण



■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले होते. "बावनकुळेंच्या दबावामुळे आणि सांगण्यावरूनच मराठा समाजाची कुणबी जात प्रमाणपत्रे आणि त्यांची वैधता (Validity) रद्द केली जात आहे. त्यांची नार्को टेस्ट करा," अशी आक्रमक मागणी जरांगे यांनी केली होती. यावर आता चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्रकार परिषद घेऊन सविस्तर स्पष्टीकरण देत जरांगेंचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या नार्को टेस्टच्या मागणीवर बोलताना बावनकुळे म्हणाले, "माझी नार्को टेस्ट करता येईल, त्याला माझी कोणतीही हरकत नाही किंवा अडचण नाही. माझी त्याला पूर्ण परवानगी आहे." अशा शब्दांत त्यांनी जरांगेंचे आव्हान स्वीकारण्याची तयारी दर्शवली. कुणबी प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठी फोन केल्याच्या आरोपावर बावनकुळे यांनी तांत्रिक बाजू स्पष्ट केली. ते म्हणाले, "जात पडताळणी विभाग हा अर्धन्यायिक आहे. या समितीला स्वतंत्र आणि न्यायिक अधिकार असतात. या प्रक्रियेमध्ये राज्य सरकार, कोणताही मंत्री किंवा अधिकारी अजिबात हस्तक्षेप करू शकत नाही. मी स्वतः जरी प्रयत्न केला तरी, मी जात पडताळणी समितीला फोन करून निर्णय बदलण्यास सांगू शकत नाही. त्यामुळे बावनकुळे किंवा दुसऱ्या एखाद्या मंत्र्यांनी फोन करून जात प्रमाणपत्रे रद्द करायला लावली, हा आरोपच मुळात चुकीचा आहे. असे या राज्यात काय, कुठल्याच राज्यात होऊ शकत नाही." कुणबी प्रमाणपत्रांची व्हॅलिडिटी रद्द झाल्याच्या तक्रारीवर बावनकुळे म्हणाले, "जात पडताळणी समिती कागदपत्रे आणि पुरावे तपासूनच निर्णय घेते. हा त्यांचा अंतिम निर्णय नसतो. जर कोणाला वाटत असेल की समितीचा निर्णय चुकला आहे किंवा त्यांच्यावर अन्याय झाला आहे, तर त्यांना थेट उच्च न्यायालयात अपील करण्याचा अधिकार आहे. तिथून तातडीने न्याय किंवा स्थगिती मिळवता येते, त्यामुळे संबंधितांनी ही प्रक्रिया अवलंबली तर जास्त बरे होईल." "तुमच्या एका बावनकुळेंसाठी मी भाजपचे २५ ते ३० आमदार पाडून दाखवेन आणि देवेंद्र फडणवीसांचे वाटोळे करेन," या मनोज जरांगे यांच्या थेट इशाऱ्यावर बोलणे बावनकुळे यांनी टाळले. ते म्हणाले, "आरोप करणे त्यांचे काम आहे, पण रोज आरोप-प्रत्यारोप करत बसणे, हा माझा पिंड नाही. ते काय बोलले, यावर मी जास्त चर्चा करणार नाही किंवा प्रत्युत्तरही देणार नाही.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जागेचा वाद सुटला

याच पत्रकार परिषदेत बावनकुळे यांनी ठाणे जिल्ह्यातील भाईंदरपाडा येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या जागेबद्दल एक महत्त्वाचा निर्णय जाहीर केला. ते म्हणाले, "११०० एकर जागेवरून खाजगी दावेदार आणि वन विभाग यांच्यात वाद सुरू होता. याप्रकरणी आम्ही अंतिम अर्धन्यायिक आदेश काढला असून, ही सर्व जागा आता 'वन विभागाच्या' नावाने करण्यात आली आहे. त्यामुळे ही जागा खासगी लोकांच्या घशात घातली जात असल्याच्या बातम्या खोट्या ठरल्या आहेत. वनाची जागा वनालाच राहिली पाहिजे, हा सरकारचा उद्देश साध्य झाला आहे."

## गद्दारीचा शिक्का पुसणार होतो : मनोज जरांगे

■ सातारा (दै. संध्या)



राज्यात मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्रांवरुन मोठ्या घडामोडी सुरू आहेत. सरकारकडून देण्यात आलेली प्रमाणपत्रे ही न्यायालयाकडून अवैध ठरवण्यात येत असल्याच्या घटना वाढत आहेत. त्यामुळेच मनोज जरांगे यांनी पहिल्यांदाच एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करून त्यांना इशाराही दिला आहे. त्यावर आता एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याशी राज्य शासनाचा सातत्याने संवाद सुरू असून, त्यांच्या मनातील सर्व शंका व गैरसमज लवकरच दूर होतील, असा विश्वास त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, "उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याशी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली आहे. या चर्चेची संपूर्ण माहिती उदय सामंत यांनी फोनद्वारे आपल्याला दिली आहे. सरकार मराठा समाजाच्या मागण्यांबाबत अत्यंत सकारात्मक असून चर्चेच्या माध्यमातूनच मार्ग काढण्यावर भर दिला जात आहे. आम्ही मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला 10 टक्के टिकणारे आरक्षण दिले, कुणबी प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया सुलभ केली. इतर कोणत्याही समाजावर अन्याय न करता मराठा समाजाला न्याय देण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न राहिला आहे." महायुती सरकारने मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी आणि आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ आणि 'सारथी' संस्थेच्या माध्यमातून भरीव निधी व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, असं एकनाथ शिंदे म्हणाले. इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता किंवा कोणावरही अन्याय न करता, मराठा समाजाला अधिकार देण्यात आले आहेत. मनोज जरांगे पाटील यांना शासनाने घेतलेल्या या निर्णयांची पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे संवाद आणि चर्चेच्या माध्यमातून सर्व गैरसमज लवकरच दूर होतील, असा विश्वास यावेळी एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. मनोज जरांगेंच्या आंदोलनानंतर मिळालेली कुणबी प्रमाणपत्र अवैध ठरत असल्यानं पुन्हा राजकारण तापलं आहे. या आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना लक्ष्य करणाऱ्या जरांगेंनी पहिल्यांदाच थेट एकनाथ शिंदेंवर अत्यंत तिखट प्रहार केला. गेल्या तीन वर्षात पहिल्यांदाच एकनाथ शिंदेंचं नाव मी घेत आहे. शिंदेंवरचा गद्दारीचा डाग आम्ही पुसणार होतो, मात्र आमच्यावर उद्धव ठाकरे बरे असं म्हणण्याची वेळ येऊ देऊ नका असा विखारी वार जरांगेंनी केला. तसंच शिंदेंचे 15 ते 20 आमदार पाडण्याचा इशाराही जरांगेंनी दिला. तसंच 2029 च्या निवडणुकीत मोठा बदला घेण्याचा इशाराही जरांगेंनी दिला.

## थोडक्यात...

### प्रमाणपत्रे जाणीवपूर्वक रद्द होत नाहीत : मुख्यमंत्री

मुंबई : दैनिक संध्या

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी कुणबी प्रमाणपत्र रद्द केल्याच्या प्रकरणावरून सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. राजकीय द्वेषापोटी आणि काही मंत्र्यांच्या सांगण्यावरून हजारो विद्यार्थ्यांची कुणबी प्रमाणपत्रे रद्द केली जात आहेत, असा जरांगेंचा आरोप होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत माध्यमांशी बोलताना सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, "मनोज जरांगे पाटील नेमके काय बोलले हे मी पूर्ण ऐकलेले नाही. मात्र, मी अगदी स्पष्टपणे सांगतो की, जेव्हा कोणतीही प्रमाणपत्रे जात पडताळणी समितीकडे जातात, तेव्हा ही समिती सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि नियमांच्या अंतर्गत काम करते. यामध्ये राज्य सरकारचा किंवा कुठल्याही मंत्र्याचा कोणताही हस्तक्षेप किंवा दखलंदाजी नसते." कुणबी प्रमाणपत्रे रद्द होण्यामागील कारणांचे विश्लेषण करताना फडणवीस म्हणाले, "जात पडताळणी समितीकडे मोठ्या प्रमाणात वेगवेगळी प्रमाणपत्रे येतात. त्यामध्ये ओबीसी किंवा नॉन-कुणबी प्रमाणपत्रांचा विचार केला, तर साधारण १० टक्के आणि काही ठिकाणी कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास 25 टक्क्यांपर्यंत रिजेक्शन रेट असतो. त्यामुळे कोणीतरी जाणीवपूर्वक किंवा राजकीय द्वेषातून ही प्रमाणपत्रे रद्द करत आहे, असा आरोप करणे चुकीचे आहे."

### जेन-झी प्रामाणिक अन् देशभक्त : मोहन भागवत

मुंबई : दैनिक संध्या

आरएसएस प्रमुख मोहन भागवत म्हणतात की, जनरेशन-झेड आणि जनरेशन-अल्फा हे जुन्या पिढीपेक्षा अधिक देशभक्त आणि प्रामाणिक आहेत. ते म्हणाले, "आपण त्यांचे ऐकले पाहिजे. त्यांच्याशी संवादाचा अभाव होता, म्हणूनच दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन झाले." भागवत मुंबईतील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते. इंडिया इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आपल्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त याचे आयोजन करत आहे. नीट पेपरफुटीविरोधात देशभरात झालेल्या आंदोलनानंतर आरएसएसचा तरुणांसोबतचा हा सर्वात महत्त्वाचा संवाद मानला जात आहे. जंतर मंतरवरील ३६ दिवसांच्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पाडले गेले. भागवत म्हणाले, "घरात पाणी आणि विजेची बचत करा. आंघोळीसाठी ४५ मिनिटे नव्हे, तर १५ मिनिटे घ्या." लग्नसमारंभात लागणाऱ्या रोषणाईचा विचार करा. हे सर्व समाजाकडून केले जाते. जागरूकता आधीच निर्माण झाली आहे आणि ती आणखी वाढली पाहिजे. आता, जर आपल्याला पर्यावरण संरक्षण, विकास आणि रोजगार हवा असेल, तर आपल्याला उर्वरित जगापेक्षा एक वेगळे मॉडेल स्वीकारावे लागेल. तुम्ही आंबेडकरांच्या विचारांचे पालन केले पाहिजे. जोपर्यंत आरक्षण अस्तित्वात आहे, तोपर्यंत सामाजिक भेदभाव सुरूच राहील. यात राजकारण होता कामा नये. यामुळे समाजात भेदभाव निर्माण होतो आणि ऐक्य येत नाही. मी हेही पाहतो की कामगारांना कमी लेखले जाते. एक पान विक्रेतासुद्धा २९ लाख रुपयांची मालमत्ता उभारू शकतो; हे केवळ एक उदाहरण आहे. प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळणे अशक्य आहे. कष्टाशिवाय पैसे मिळू शकतात, असा विचार करणे अशक्य आहे.

## सरकारला फक्त हिंदू-मुस्लीम दिसतं, पक्ष चोरले जात आहेत : अभिजीत दिपके

■ पुणे (दै. संध्या)

सुशिक्षित बेरोजगारांपैकी 80 टक्के लोकांकडे पदव्या आहेत. देशातील तरुणांना वाटत आहे की "आम्ही शिकून काही चुकी केली आहे का? कारण ज्या लोकांनी कधी फॉर्मल डिग्री घेतली नाही ते सरकार चालवतात, निर्णय घेतात, पण ज्या तरुणांनी लहानपणापासून मेहनत केली, डिग्री घेतली, त्यांना असं वाटतंय की आम्ही डिग्री घेऊन चुकी केली कारण आमचं भविष्य अशिक्षित लोक ठरवत आहेत, अशा शब्दात कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी हल्लाबोल केला. बेरोजगारी हा आता निवडणुकीचा आणि राजकीय चर्चेचा मुख्य मुद्दा बनवायचा आहे, ज्याला कोणीही दुर्लक्ष करू शकत नाही, असेही त्यांनी नमूद केले. अभिजित दिपके म्हणाले, तुम्हाला जर कोणी म्हणत असेल की कुठली एक ऑर्गनायझेशन किंवा कुठला एक व्यक्ती सगळे प्रॉब्लेम सॉल्व्ह करेल, तर तो तुमच्याशी खोटं बोलत आहे. 2014 मध्ये देशाशी असेच खोटे बोलण्यात आले होते की एक व्यक्ती देश बदलू शकेल, पण प्रत्यक्षात "काशीची काशी झालेली आहे" असा टोला त्यांनी लगावला. कोणताही एक व्यक्ती किंवा संस्था देशाचे सर्व प्रश्न सोडवू शकत नाही, म्हणूनच ज्या संघटनांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि सिव्हिल सोसायटीने



पाठिंबा दिला, त्या सर्वांशी एकत्र येऊन एकजूट करण्यात येईल. आता देशाला सगळ्यांनी आपल्या राजकीय विचारसरणीच्या वर उठून, "नागरिक म्हणून एकत्र येऊन देशात सुधार आणायची गरज आहे" असे त्यांनी सांगितले. अभिजित दिपके म्हणाले, कॉकरोच जनता पार्टी येणाऱ्या सप्टेंबर महिन्यात "क्या बोलती पब्लिक" हे राष्ट्रीय अभियान सुरू करणार आहे, जो एक देशव्यापी दौरा असेल. या कॅम्पेनमधून आम्ही देशभरात दौरा करणार आहे, आम्ही लोकांकडून समजून घेणार आहे त्यांच्या समस्या काय आहेत, त्यांच्या अपेक्षा काय आहेत. कारण सध्याचे सत्ताधारी आणि राजकीय पक्ष लोकांपासून पूर्णपणे "डिस्कनेक्ट" झाले आहेत आणि लोकांचे ऐकून घेण्यास तयार नाहीत आणि आपल्याला दुर्लक्षित केलं जात असल्याची भावना लोकांमध्ये झाल्याचे ते म्हणाले.

## निर्मला नवलेंची राष्ट्रवादीच्या युवती प्रदेशाध्यक्षपदी निवड

■ मुंबई (दै. संध्या)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या युवती आघाडीच्या नेतृत्वात मोठा बदल करण्यात आला असून, पुणे जिल्ह्यातील कारेगावच्या माजी सरपंच निर्मला नवले यांची राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या विद्यमान युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे यांच्या जागी आता निर्मला नवले यांच्याकडे ही महत्त्वाची धुरा सोपवण्यात आली आहे. देवगिरी या शासकीय निवासस्थानी आयोजित एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शुभहस्ते निर्मला नवले यांना निवडीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. निर्मला नवले यांनी पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कारेगावचे सरपंचपद भूषवले आहे. स्थानिक पातळीवर, विशेषतः ग्रामीण भागात त्यांनी तरुण आणि महिलांचे संघटन मजबूत करण्यासाठी मोठे काम केले आहे. त्यांच्या या कार्याची आणि पक्ष संघटनेतील सक्रियतेची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर युवती प्रदेशाध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे. या नवीन नियुक्तीमुळे पक्षाच्या युवती आघाडीला अधिक ऊर्जा मिळेल आणि आगामी काळात राज्यातील तरुणींचे प्रश्न आक्रमकपणे मांडले जातील, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून व्यक्त करण्यात आला आहे. उच्च शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या निर्मला शुभम नवले यांनी 2021 मध्ये वयाच्या अवघ्या 27 व्या वर्षी सार्वजनिक जीवनात प्रवेश करत एक वेगळा ठसा उमटवला आहे. पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या कारेगावच्या सरपंचपदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आता राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदापर्यंत पोहोचला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक प्रशासन आणि लोकाभिमुख उपक्रमांच्या जोरावर त्यांनी ग्रामविकासाचा एक नवा पॅटर्न तयार केला आहे. अभियांत्रिकी पदवी (B.E. IT) प्राप्त केलेल्या निर्मला नवले यांनी 2021 मध्ये कारेगावच्या सरपंचपदाची सूत्रे हाती घेतली. आयटी इंजिनिअर असलेल्या निर्मला नवले यांनी गावातील रस्ते, पाणी, वीज आणि स्वच्छता या मूलभूत गरजांसोबतच ग्रामविकासात आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घातली. ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार त्यांच्या कार्यकाळात सुमारे 72 कोटी रुपयांची विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. कारेगावमधील उल्लेखनीय काम आणि दांडगा जनसंपर्क पाहून दिवंगत नेते अजित पवार यांनी निर्मला नवले यांच्यावर राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेश कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली होती. या काळात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील युवतींशी थेट संवाद साधून संघटन मजबूत केले. आता प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे संपूर्ण राज्यातील युवतींचे सक्षम संघटन उभारणे आणि नव्या महिला नेतृत्वाला संधी देण्याची मुख्य जबाबदारी आली आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करताना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता, सायबर छळाविरोधात जागृती, आरोग्य, स्वावलंबन आणि तरुणींचे राजकीय प्रतिनिधित्व या विषयांवर विशेष भर देण्याचा मानस निर्मला नवले यांनी व्यक्त केला आहे.

# ज्या आधारे शिंदे आमदार-मंत्री झाले ती घटनाच नाकारली


■ मुंबई (दै. संध्या)

घटनेच्या दहाव्या अनुसूचीमध्ये विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष हा वेगळा मानण्यात आला आहे. शिवसेनेतील फूट ही विधिमंडळातील फूट होती. पण ती राजकीय समजण्यात आली आणि निवडणूक आयोगाने चुकीचा निर्णय घेतला, असा युक्तिवाद ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. तसेच उद्धव ठाकरे प्रमुख असताना ज्या घटनेच्या आधारे एकनाथ शिंदे आमदार आणि मंत्री झाले, ती घटनाच त्यांनी नाकारली, असा युक्तिवादही कपिल सिब्बल यांनी केला.

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेचे दोन भाग झाले. त्यानंतर निवडणूक आयोगाने शिंदेंची शिवसेनाच ही खरी शिवसेना असल्याचा निकाल देत पक्ष आणि चिन्ह त्यांना दिलं. त्याच प्रकरणाची सुनावणी आता सर्वोच्च न्यायालयात असून ती अंतिम टप्प्यात असल्याचं चित्र आहे. ठाकरेंच्या वतीने जेष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल (Kapil Sibal) यांनी युक्तिवाद केला.

शिवसेना सुनावणीतील मोठे 20 मुद्दे

### कपिल सिब्बलांच्या युक्तिवादातील मोठे मुद्दे




1. एकनाथ शिंदे यांच्या बंडापूर्वीच शिवसेनेची घटना अस्तित्वात होती. फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी ती नाकारली.
2. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या घटनेच्या आधारेच आमदार आणि मंत्री झालेल्या शिंदे गटाला तीच घटना नाकारण्याचा अधिकार नव्हता.
3. 2018 मधील शिवसेनेची घटना निवडणूक आयोगाने अमान्य केली, मात्र आयोगाला तो अधिकार होता का? असा मूलभूत प्रश्न सिब्बल यांनी उपस्थित केला.
4. विधिमंडळ पक्षात पडलेली फूट ही राजकीय पक्षातील फूट मानता येत नाही. पण निवडणूक आयोगाने आणि विधानसभा अध्यक्षांनी त्या आधारे निर्णय दिला, तो असंवैधानिक आहे.
5. एकनाथ शिंदे यांच्यासोबत सुरुवातीला फक्त काही आमदार होते, त्यावरच विधानसभा अध्यक्षांनी निर्णय दिला. तो चुकीचा ठरतो.
6. शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतील 160 हून अधिक पदाधिकारी उद्धव ठाकरे यांच्यासोबत होते, त्यामुळे फूट फक्त विधिमंडळ पक्षात होती. राजकीय पक्षात कोणतीही फूट नव्हती.
7. सादिक अली प्रकरण, केरळमधील एका निकालाचा दाखला देत राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष वेगळे असल्याचा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.
8. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेच्या घटनेत बदल करण्याचा अधिकार नव्हता.
9. 17 फेब्रुवारी 2023 पासून विधिमंडळ पक्षालाच राजकीय पक्ष मानण्याचा निवडणूक आयोगाचा दृष्टिकोन घटनाबाह्य असल्याचा दावा केला.
10. निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकारक्षेत्राचा (Jurisdiction) चुकीचा वापर केला.
11. 21 जून रोजी पक्षात फूट पडल्याचा कोणताही प्रथमदर्शनी (Prima Facie) पुरावा नव्हता.
12. अपात्रतेचा निर्णय होण्यापूर्वीच पक्षचिन्ह काढून घेणे आणि शिंदे गटाला देणे, हा निवडणूक आयोगाचा निर्णय चुकीचा होता.
13. घटनापीठाने अपात्रतेचा निकाल येईपर्यंत निवडणूक आयोगाने थांबावे, अशी विनंती आम्ही केली होती.
14. निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या चुकीच्या निर्णयामुळेच पुढील सर्व घडामोडी घडल्या.
15. सत्ता ही चुंबकासारखी असते, त्याच्याकडे सर्वजण आकर्षित होतात. सत्तेचा वापर करून शिंदे गटाने आमदार आणि खासदारांची संख्या वाढवली; त्यामुळे मिळालेले बहुमत नैसर्गिक नव्हते.
16. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतरच अधिक आमदार आणि नंतर खासदार त्यांच्या गटात गेले.
17. शिंदे गटाने स्वतंत्र ठराव मंजूर करून स्वतःचा पक्षप्रतोद नियुक्त केला, हीदेखील अपात्रतेची महत्त्वाची बाब आहे.
18. या घटना अपात्रतेच्या याचिकेनंतर घडल्या असल्या तरी त्याने कायदेशीर परिणाम बदलत नाही, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले.
19. 23 जून, 27 जून आणि 2 जुलै 2022 या तारखा अपात्रतेच्या प्रक्रियेत महत्त्वाच्या असल्याचे सिब्बल यांनी न्यायालयाला सांगितले.
20. त्या वेळच्या आमदारांचा कार्यकाळ संपला असला तरी त्यावेळच्या निर्णयांचा परिणाम पक्ष, चिन्ह आणि पुढील सर्व घटनांवर झाला असल्याने अपात्रतेचा मुद्दा आजही निर्णायक आहे.

## डॉक्टरांचा संप तातडीने मागे घेण्याचे हायकोर्टाचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना नोंदणी देण्याच्या प्रस्तावाविरोधात संपावर गेलेल्या डॉक्टरांना मुंबई हायकोर्टाने झटका दिला आहे. डॉक्टरांना संप तातडीने मागे घेण्याचे निर्देश मुंबई हायकोर्टाने दिले आहेत. आम्ही तुमची बाजू ऐकून घेऊ पण संप तातडीने मागे घेणे आवश्यक आहे, संप मागे घेतला जात असेल तर आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकून घेऊ, असे न्यायालयाने डॉक्टरांना फटकारताना सांगितलं. काम बंद केलंत ना, मग पगार घेणंही बंद करा, अशा शब्दात न्यायालयाने सुनावलं. दरम्यान, डॉक्टरांनी पुकारलेल्या संपाविरोधात मुंबई उच्च न्यायालयाने मार्डची चांगलीच खरडपट्टी केली. न्यायालयाने प्रश्नांची सरबत्ती करताना डॉक्टरांनी संप करणं योग्य आहे का? अशी विचारणा केली. तुम्ही उपचार करण्यास नकार देताय? असा सवाल सुद्धा उपस्थित केला. रुग्णांना सेवा देत नाहीत हे छान वाटतं का? अशी विचारणा करत मुंबई हायकोर्टाने MARD खडेबोल सुनावले. डॉक्टरांचा संप तातडीने मागे घेण्यात यावा, अशा शब्दात हायकोर्टाने निर्देश दिले. आम्ही तुमची बाजू ऐकून घेऊ पण संप तातडीने मागे घेणे आवश्यक असल्याचे हायकोर्टाने सुनावले. संप मागे घेतला जात असेल तर आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकून घेऊ, असे न्यायालयाने नमूद केले. दरम्यान, या प्रकरणी पुढील सुनावणी 8 सप्टेंबर रोजी होणार आहे.

## संपादकीय

# या खेळात जिंकतंय कोण?

एक खेळात हरली, दुसरी प्रेमात. एकीने आयुष्य संपवले, दुसरी आयुष्यातून उठली. हा कोणता खेळ आहे ? यात कोण जिंकते ?

'जेन झी' हा सध्या परवलीचा शब्द बनला आहे. त्यांचे कौतुक करताना अनेकांचे कंठ थकत नाहीत. त्यांना शिव्या देताना अनेकांच्या जिव्हा थांबत नाहीत. दोन्ही बाजूंनी ही घुसळण सुरू असताना, 'जेन झी'च्या संदर्भात घडलेल्या दोन घटनांनी नागपूरकरांचे हृदय पिळवटून टाकले आहे. त्यांचा परस्पर संबंध नसला तरी, त्या समाजाला अंतर्मुख करणाऱ्या, मूलभूत प्रश्न उभे करणाऱ्या आहेत. पहिली गोष्ट आहे क्रिकेटपटू अदितीची. भावाच्या पावलावर पाऊल ठेवत तिने स्पाइकचे जोडे घातले. हातात ग्लोव्ह्ज चढविले. बॅट फिरवित मैदानावर उतरली. अधिक उत्तम प्रशिक्षण मिळावे म्हणून ही भावंडे अकोल्याहून नागपुरात आली. खडतर सराव करू लागली. विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मुलीच्या संघात निवड न झाल्याने, नाराज अदितीने बॅट भिरकावली. ग्लोव्ह्ज फेकले. दोरी जवळ केली आणि गळफास घेतला. 'माझी निवड झाली नाही, तू चांगला खेळ' असे चिठ्ठीत लिहीत तिने आयुष्याचा खेळ संपविला. लहान मुले संवेदनशील असतात. भावनेचा कोंडमारा झाला की, टोकाचा निर्णय घेऊ शकतात. पण, हे अदितीकडून अपेक्षित नव्हते. कारण, ती खेळाडू होती. खेळ सांघिक भावना शिकवतो. जय-पराजय पचवायची शक्ती देतो. खिलाडूवृत्ती शिकविणारे मैदानाच जर आयुष्य संपविण्याचे कारण बनत असेल, तर खेळ कुठे तरी बिघडत आहे.

दुसरी घटनाही अस्वस्थ करणारी. सोळा वर्षीय मुलीची ओळख सोशल मीडियाच्या माध्यमातून मध्य प्रदेशातील तरुणाशी झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. निसरडे वय हे. दोघेही घसरत घसरत वेगळ्याच वळणावर गेले. उमलत्या कळीच्या पोटात गर्भ पेरून तो पळून गेला. तिच्या शरीरातील बदल घरच्यांच्या लक्षात येईपर्यंत खूप वेळ झाला होता. त्यांनी रुग्णालय गाठले. मुलीचे वय लपविण्यासाठी खोटे आधारकार्ड सादर केले. तिचे बाळ बेकायदेशीरपणे दुसऱ्या परिवाराला देऊन टाकले. आधी एक चूक; ती सावरण्यासाठी दुसरी चूक. पुढे चुकांचा डोंगर. त्या कोवळ्या कळीच्या आयुष्याचे जे मातेरे व्हायचे ते झालेच. तिला अकाली प्रौढत्व आले. तिच्या परिवाराच्या भाळी डोंगराएवढे दु:ख कोसळले.

अशा संवेदनशील घटना यापूर्वीही घडल्या असतील. त्यावर दोन अश्रू ढाळले गेले असतील. चर्चाही झडल्या असतील. विस्मरणात गेल्या असतील. अशा घटनांकडे, गुन्हा, आत्महत्या किंवा सामाजिक अध:पतन म्हणून दुर्लक्ष करणे योग्य नव्हे. या घटना समाजाला धडा देणाऱ्या आहेत. मुलांना यशाची स्वप्ने जरूर दाखवावीत, त्यासाठी त्यांना तयार करावे, पण अपयश स्वीकारण्याची क्षमताही विकसित करावी. प्रेम म्हणजे जबाबदारी, खेळ म्हणजे संघर्ष आणि आयुष्य म्हणजे वारंवार ठेचा खाऊन पुन्हा पुन्हा उभे राहण्याची, उभारी घेण्याची शक्ती. या गोष्टी घर, शाळा, मैदान आणि समाज या सगळ्यांनी मिळून रुजवाव्या लागतील.

मृत्यू आधार वाटावा, घराबाहेरील व्यक्ती आपली वाटावी, इतके आपण परिवारापासून दूर चाललो आहोत का? संवाद चिंचोळा होत चालला आहे का? आयुष्य पणाला लावण्यापूर्वी एकदा जन्मदात्याशी बोलावे असे का वाटत नसावे? आपल्या पोटचा गोळा काही तरी वेगळ्याच विचारात आहे हे जन्मदात्यांना का जाणवत नसावे? जेव्हा अपयश, प्रेमभंग, नकार, भीती यासारख्या भावना व्यक्त करण्यासाठी हक्काची जागा उरत नाही, तेव्हा टोकाचे निर्णय घेतले जातात. ते एकाएकी घेतले जात नाहीत. संवाद थांबला असेल तर तो सुरू करावा लागेल. सुरू असेल तर वाढवावा लागेल. मुलांना यशाची महती सांगताना, अपयशाची जाणीव करून द्यावी लागेल. खेळात संघात निवडले जाणे महत्त्वाचे असतेच, त्यापेक्षाही महत्त्वाचे असते, जिंकताना पराभवाची शक्यता बाळगणे आणि हरल्यावर जिंकण्याची ऊर्मी ठेवणे. विजय स्टेटसवर झळकवता येतो म्हणून चांगला आणि पराभवाची वेदना एकाकी असते म्हणून वाईट असे ठरविता येणार नाही. कधी हार तर कधी जीत हाच खरा खेळ आहे. खोट्या खेळात हरणे वाईटच.

## उपदेशकथा

### नादिरशाही

नादिरशहा हा इराणचा बादशहा. १७३९ मध्ये त्याने भारतावर स्वारी केली. त्याने दिल्ली जिंकली नि त्याच्या सैनिकांनी शिरकाण आरंभले. तीस हजार प्राणांना मुकले. परत फिरताना त्याने लूट किती न्यावी? तीस कोटी रुपये खंडणी, कोहिनूरसहित अगणित जडजवाहीर, मयूर सिंहासन, एक हजार हत्ती सात हजार घोडे, दहा हजार उंट, मुघल जनानखान्यातील सुंदर स्त्रिया, दोनशे कारागीर, शंभर मिस्त्री व दोनशे सुतार एवढी लूट त्याने नेली. असे तवारिखा लिहितात. इराणमध्ये या लुटीमुळे अर्थव्यवस्था एवढी सुधारली की त्याने राज्यात सारे कर, सारा वसुली इत्यादी रद्द केली. दिल्लीत त्याने कत्ले आम चा हुकूम दिला. त्याच्या सैनिकांनी मुंडक्यांचे मिनार उभारले. राजधानी दिल्ली रक्ताने रंगून निघाली. त्याच्या वजिराचे पत्थरदिलही द्रवले; पण नादिरशहाच्या काळजाला पाझर फुटेना. वजीरसाहेब सोनेरी मशिदीकडे धावले. तेथे शहेनशाह बंदगी करण्यात मग्न होते. नमाज संपताच वजिराने काकुळतीने विनंती केली. कत्तल थांबवा म्हणून रदबदली केली. यावर बादशहा खवळला. दिल्ली उद्ध्वस्त झाल्याखेरीज हुकमाची तामिळी चालूच राहील, असे त्याने फर्मावले. वजिराने धीर न सोडता खाविंदांना एक फारसी वचन सुनावले – कस न मान्द कि दीगर ब तेंगे नाज कशी। मग कि जिन्दा कुनी खत्क राव बाजी कुशी।। (आपल्या पराक्रमी समशेरीपुढे साऱ्यांनी माना टाकल्या. नावाला कुणी उरलं नाही. आपल्या कृपादृष्टीनं मेलेल्यांना जिवंत तरी करा, म्हणजे कत्तल अशीच चालू ठेवता येईल) या शब्दांनी शहा भानावर आला व त्याने बीजन बंद करण्याचे फर्मान काढले. पुढे इराणात गेल्यावर तो भ्रमित झाला. त्याच्याच दरबाऱ्यांनी त्याच्या तलवारी चालवल्या.

कथा उपदेश : याच जन्मात आपल्याला कृतकर्माचे फळ भोगावे लागतेच.

## गुरु वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''

दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असमे!

## संस्कृत सुभाषित

अभ्यासेन कटुद्रव्यं भवत्यभिमतं मुने । अन्यस्मै
रोचते निम्बमन्यस्मै मधु रोपते ।।

अर्थ : हे ऋषीवर्या, अभ्यासाने कडू द्रव्यसुद्धा आवडीचे होते. सतत सेवन केल्याने कडुनिम्बसुद्धा आवडू लागतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:नवमी १६:३७:१४ |
| ७ ऑगस्ट २०२६ | नक्षत्र:कृत्तिका १८:४२:५८ |
| शुक्रवार | योग:वृद्धि १२:१०:१८ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:गर १६:३७:१४ |
| आषाढ शके | करण:वणिज |
| संवत्– १९४८ | २७:२०:४९+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:कर्क |
| अयन– दक्षिणयन | चन्द्र:वृषभ०१:५३:०३ |
| मास– आषाढ | हिजरी सन् – १४४८ |
| ऋतु– सौर वर्षा | मुस्लिम मास – सफर |
| कृष्ण पक्ष | तारीख – २३ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | 8 | | 2 | | | |
| | | 3 | 1 | | | 8 | | 2 |
| 2 | | | | 4 | | | 9 | 5 |
| | | | | 7 | | 2 | | 8 |
| 8 | | 5 | | 1 | | 3 | | 4 |
| 1 | | 7 | | 3 | | | | |
| 7 | 5 | | | 8 | | | | 9 |
| 4 | | 6 | | | 1 | 5 | | |
| | | | 9 | | 5 | | 4 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०३२ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 8 | 9 | 6 | 3 | 5 | 7 | 4 |
| 7 | 3 | 9 | 4 | 5 | 1 | 2 | 6 | 8 |
| 4 | 6 | 5 | 8 | 2 | 7 | 9 | 1 | 3 |
| 9 | 8 | 6 | 5 | 7 | 4 | 1 | 3 | 2 |
| 1 | 5 | 2 | 6 | 3 | 8 | 4 | 9 | 7 |
| 3 | 4 | 7 | 2 | 1 | 9 | 6 | 8 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 6 | 3 | 2 | 1 |
| 8 | 2 | 3 | 1 | 9 | 5 | 7 | 4 | 6 |
| 6 | 7 | 1 | 3 | 4 | 2 | 8 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८१९ – बॉयाकाची लढाई – सिमोन बॉलिव्हारच्या सैन्याने स्पेनच्या सैन्याचा पाडाव केला.
- १८८८ – लंडनमध्ये जॅक द रिपरने पहिला खून केला.
- १९४२ – दुसरे महायुद्ध – ग्वादालकॅनालची लढाई सुरू.

### राष्ट्रीय

- १९४७ – मुंबई महापालिकेने बेस्ट कंपनी आपल्या अधिकारात घेतली.
- १८९० – 'केसरी' च्या खालोखाल प्रसिद्ध असणारे जहाल वृत्तपत्र 'मादेवृत्त' याचा पहिला अंक भाऊशास्त्री लेले यांनी प्रसिद्ध केला.
- १९८७ – आरती प्रधानने इंग्लिश खाडी पोहुन पार केली.
- २००४ – भारतीय बनावटीचा अर्जुन रणगाडा लष्करात दाखल.

### जन्म

- ३१७ – कॉन्स्टेन्टियस दुसरा, रोमन सम्राट.
- १८१६ – माटा हारी, डच गुप्तहेर.
- १९२५ – एम.एस. स्वामीनाथन, भारतीय शेतीतज्ञ.
- १९३७ – डॉन विल्सन, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९४० – ज्याँ–लुक डेहेन, बेल्जियमचा पंतप्रधान.
- १९५९ – अली शाह, झिम्बाब्वेचा क्रिकेट खेळाडू.
- १९६६ – जिमी वेल्स, विकिपिडीयाचा स्थापक.

### निधन

- ४६१ – माजोरियन, रोमन सम्राट.
- ४७९ – युराकु, जपानी सम्राट.
- ११०६ – हेन्री चौथा, पवित्र रोमन सम्राट.
- १८५५ – मेरियानो अरिस्ता, मेक्सिकोचा राष्ट्राध्यक्ष.
- १९४१ – रवींद्रनाथ टागोर, बंगाली कवी, लेखक, नोबेल पारितोषिक विजेता.

## : SMS :

Wife: Tum shaadi se pehle kehte the "tumhari har baat maanunga"
Husband: Haan, us time EMI nahi thi na

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.२ | २३.९ |
| अहमदनगर | ३० | २२.४ |
| अकोला | ३६.९ | २५.५ |
| अमरावती | ३५.६ | २५.६ |
| बीड | ३८.१ | २६.४ |
| भंडारा | ३८.६ | २६.५ |
| बुलढाणा | ४२ | २६.३ |
| चंद्रपूर | ३७.७ | २६.५ |
| चेन्नई | ४०.९ | ३०.८ |
| नवी दिल्ली | ४१.५ | ३२.१ |
| धुळे | ३५.२ | २५.७ |
| गोंदिया | ३७ | २६.५ |
| जळगाव | ३६.५ | २५.३ |
| कोल्हापूर | २६.५ | २१.९ |
| लातूर | २९.२ | २२.९ |
| मुंबई | ३३.६ | ३१.४ |
| नागपूर | ३७.५ | २५.६ |
| नांदेड | ३५.६ | २५ |
| नंदूरबार | ३१.४ | २५ |
| नाशिक | २९.४ | २२.६ |
| पुणे | २६.३ | २२.४ |
| पंढरपूर | ३१.९ | २४.३ |
| सातारा | २९.८ | २१ |
| सांगली | २९.३ | २२.६ |
| सोलापूर | ३१.९ | २४.६ |
| वर्धा | ३७.४ | २५.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम परिवाराच्या मदतीने पुढे जाल. व्यावसायिक कार्यात फायदा होण्याची शक्यता.

**तुळ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर वाद–विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : उत्तर आर्थिक कामे पूर्ण होतील. परिवाराकडून सहकार्य मिळेल. काही नवीन योजना हाती घ्याल.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर व्यावसायिक जबाबदारी व्यवस्थित पार पाडा. प्रवास सुखाचा होईल. आर्थिक स्थिती उत्तम राहील.

**मिथुन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम चतुर्याने काम केल्यामुळे वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.

**धनु :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम वरिष्ठ लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल. चातुर्याने काम केल्यास यश निश्चित. नवीन संपत्ती जमविण्याचा योग.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील.

**मकर :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम आवक–जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.


**सिंह :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : उत्तर व्यावसायिक अथवा जीवनातील समस्या वाढण्याची शक्यता. कौटुंबिक चिंता सुटेल.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. खर्चात कपात करावी.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम मित्र व हितचिंताकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०३३



**आडवे शब्द**

१. आजोबांचे वडील
४. माजघरातील भांडण
७. तात्काळ चपखल उत्तर देणारा
१२. ठिबकणारा, गळणारा
१४. ग्रामीण बोलीत साप–नाग इ.
१५. कट्टर
१७. पगारपुस्तक
२०. त्या प्रमाणे
२२. महामार्गावरील खाद्यसंस्कृतीचे उगमस्थान
२३. रत्न (हिंदी)
२८. पालिकेचा प्रवेशकार
२९. जून, निबर
३१. कौतुकाचे भरते
३३. बगीचा
३४. बनकर
३६. '––खावे लोखंडाचे, तेव्हा ब्रह्मपदी नाचे'
३७. शोभणारा
३८. चर्चा, भांडण, बोलाचाली
४०. जवळ (हिंदी)
४२. खिशाला बसल्यास खर्च, खाल्ल्यास चटकदार
४३. जहाजांचा धक्का
४५. मोठी टोपली
४६. मोठ्या शिस्तीचा
४७. त्याप्रमाणे
४८. नवऱ्याचा भाऊ
५०. पोते शिवण्याची जाड सुई
५१. सेवक, भक्त
५२. 'दिडदा दिडदा' वाजणारे वाद्य
५४. या आशयाच्या कुंतीच्या आज्ञेने द्रौपदी पांडवांची पत्नी झाली
५५. सावध राहण्याचा इशारा
५७. धान्य असल्यास ढीग, ज्योतिषात फक्त बारा
५८. दंड, शिक्षा
५९. त्रैलोक्यात फिरणारा मुनी
६०. मराठीत वडील
६२. सभ्यतेच्या मर्यादा पाळणारा
६४. दुबळा, गरीब
६५. लाकूड छिलण्याचे हत्यार
६६. धाप
६९. सरकारी असल्यास या सुट्टीचे अनेक प्रकार
७०. पांडवांची नावे
७६. शकुनीचे कौरवांशी नाते
७७. सापडल्यास मार्ग, लागल्यास बट्ट्याबोळ!
७८. संताप
८०. दर तासातील प्रमाण
८१. अर्धवर्तुळाकृती रचना, बाक
८२. व्यवस्था बघणारा
८३. बूड, मुक्काम ठोकणे

**उभे शब्द**

१. बक्षिसाचा बिल्ला, शौर्यचिन्ह
२. देवीच्या नावे मागितलेली भिक्षा
३. लोकमान्यांचे नाव
५. रामदासस्वामींच्या निवासाने पुनित झालेला किल्ला
६. सगळीकडे
७. मक्केची यात्रा
८. नेतृत्वाला समाजातून असणारा पाठिंबा
९. आवाज, ध्वनी
१०. अटीची भाषा
११. पुंगी (हिंदी)
१३. धूर्त, लबाड
१६. वाघाची ललकारी
१८. ही आवाजाची असते आणि पानाचीही!
१९. ललाट
२१. जमिनीच्या मालकी हक्काचा सरकारी दाखला
२५. एकदम स्वच्छ
२७. पर्वत
२८. अधिक लोकांना एकत्र जमण्यास मज्जाव करणारा कायदा
३०. राखणीला असलेला
३१. पुण्यात केवळ वास्तव्याने हे बिरूद मिळते असे नाही!
३२. जेमतेम
३५. हाक
३८. प्रहार, घाव
३९. रंगणारे पान
४१. पद्धतीनुसार
४४. दार
४६. मजबूत, भक्कम
४९. नियम सिद्ध करणारा
५१. नाना–नानीचे व्याही
५३. प्रज्ज्वलीत, तापलेले
५६. पाणकोंबडा
५८. अमजद अली खान यांनी लोकप्रिय केलेले वाद्य
५९. बाई, स्त्री
६१. पूर्वज
६३. प्रेमिकांसाठी हृदयाचे प्रतीकचिन्ह
६७. मेण देणारी माशी
६८. श्रीमंत
६९. वर्दळ, राबता
७१. भयंकर
७२. न थांबता, अखंडपणे
७३. अभिनेता
७४. गायनातील तान
७५. वर–वधूची मिरवणूक
७६. जननी
७९. आग्रह, भीड

**जम्बो शब्दकोडे क्र. १०३२ चे उत्तर**

आडवे उत्तर १.जोपासना ४.सहवास ७.जपान १०.खडी ११.मांजर १३.जन्मदिवस १६.चव १७.मतलब १८.भग १९.नयन २०.कर २१.नगर २१.तयारी २२.वदन २३.छे २६.पदर २८.तळी २९.शीतल ३०.धडपड ३२.यंदा ३३.रम ३५.यजमान ३७.पार्वती ३९.स्तवन ४०.नगरसेवक ४२.अचानक ४४.नरवर ४६.नकलाकार ४८.साव ४९.माता ५०.कसा ५२.लाल ५३.कोरडा ५४.राधा ५५.पारंगत ५७.सातवाहन ६०.ममता ६२.जेता ६३.वासर ६४.मणेर ६६.डहाळी ६७.काना ६८.हडळ ६९.क्षालन ७१.सदाचार ७२.कोर ७३.कसर ७५.चमत्कार ७६.वादक ७७.पाटलोण ७८.पादत्राण ७९.शाई ८०.रुमाली

उभे उत्तर : १.जोखड २.पार ३.नामांतर ४.सरबत ५.करकरीत ६.अवयव ८.पालक ९.नवरस १२.जल १४.दिन १५.सनदशीर १८.भरीत १९.मगर २२.नद २५.नतमस्तक २६.पसायदान २७.आड २८अ.निंदा ३०.धनगर ३१.पडसे ३४.मनकवडा ३६.मानवता ३७.पाककला ३८.नाचा ४१.वन ४२.अरण्यवास ४३.नफा ४५.रमाधाम ४७.लालन ४८.सारवणे ५०.करंगळी ५१.साग ५४.रामरक्षा ५६.तजेलदार ५८.तवाना ५९.हरहर ६१.ताडन ६४.मळकट ६५.रणरण ६७.कारवाई ७०.लवाद ७२.सत्कार ७२.कोकरु ७४.सलोखा ७५.चण ७७.पाली

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# चाकण एमआयडीसी परिसरातील सर्व रस्ते २५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करा

■ पुणे (दै. संध्या)

चाकण एमआयडीसी परिसरातील राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि एमआयडीसी यांच्या अखत्यारीतील सर्व रस्ते येत्या २५ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करण्यात यावेत. २५ ऑगस्ट नंतर आपण प्रत्यक्ष पाहणी करणार असल्याचे सांगून निर्धारित मुदतीनंतर अतिक्रमण काढली नाहीत तर कार्यवाही होणार तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

चाकण परिसरातील रस्त्यातील खड्डे , वाहतूक व्यवस्था, पावसाळ्यातील उपाययोजना तसेच नदी, नाल्यातील अतिक्रमणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.



■ जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांचे निर्देश

■ राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग व पीएमआरडीएच्या रस्त्यांचा समावेश

■ चाकण परिसरातील नदी, नाले व रस्त्यांवरील अतिक्रमणे एका महिन्यात स्वखर्चाने हटविण्याचे आवाहन

■ मुदतीनंतर प्रशासनाकडून अतिक्रमणे हटवून खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येणार

बैठकीस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालयाचे अधीक्षक अभियंता निलेश मोडवे, एमआयडीसीचे वरिष्ठ तांत्रिक सल्लागार संजयकुमार मांगीलवार, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)चे शिवकुमार गोपाल, चाकण वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त गुलाब इनामदार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)चे अधीक्षक अभियंता प्रवीण सुमंत यांच्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, चाकण परिसरातील नदी, नाले तसेच सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमणे संबंधितांनी एका महिन्याच्या आत स्वखर्चाने काढून घ्यावीत. मुदत संपल्यानंतरही अतिक्रमणे कायम राहिल्यास प्रशासनामार्फत ती हटविण्याची कारवाई करण्यात येईल. अतिक्रमण हटविण्यासाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. तसेच संबंधितांविरुद्ध प्रचलित कायदे व नियमांनुसार कारवाईही करण्यात येईल.

बैठकीत चाकण परिसरातील धोकादायक ठिकाणांचा आढावा घेण्यात आला. वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक गतिरोधक काढून राष्ट्रीय रस्ते काँगेसच्या मानांकानुसार गतिरोधक उभारावेत, तसेच आवश्यक त्या ठिकाणी दिशादर्शक फलक, रस्ता चिन्हे, परावर्तक पट्ट्या आणि इतर सुरक्षा उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात तसेच रस्त्यावर पार्किंग करणाऱ्यावर नियमानुसार दंड बसवून रस्त्यावर कोणीही पार्किंग करणार नाही अशा सूचनाही दिल्या.

रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर हाती घेऊन सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत रस्त्यांवरील खड्डे आणि अतिक्रमणांच्या प्रश्नावर कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असेही जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी यावेळी स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### १०००हून अधिक भागांचा सुवर्णप्रवास... आता आणखी सुपरफास्ट

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतल्या प्रेक्षकांना गेली आठ वर्षं खळखळून हसवणारी, प्रत्येक कुटुंबाचा अविभाज्य भाग झालेली आणि मराठी दूरचित्रवाणीवरच्या सर्वाधिक लोकप्रिय विनोदी कार्यक्रमांपैकी एक असलेली 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आता नव्या पर्वासह प्रेक्षकांच्या भेटीला सज्ज झाली आहे. 'ऑगस्ट महिन्यात सोनी मराठी वाहिनीवरची 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' आपल्या आठ वर्षांच्या यशस्वी प्रवासाच्या उंबरठ्यावर पोहोचत आहे.' या अविस्मरणीय प्रवासात एक हजारहून अधिक भाग आणि सुमारे तीन हजारहून अधिक भन्नाट स्किट्स सादर करत हास्यजत्रेनं महाराष्ट्रातल्या प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं आहे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'नं प्रेक्षकांचं केवळ मनोरंजन केलं नाही तर मराठीतल्या अनेक गुणी कलाकारांना घराघरांत पोहोचवून लोकप्रियता मिळवून दिली. समीर चौघुले, नम्रता संभेराव, प्रसाद खांडेकर, चेतना भट, ॲंकार राऊत, प्रभाकर मोरे, वनीता खरात, ॲंकार भोजने इत्यादी कलाकारांनी आपल्या अफलातून विनोदी शैलीनं आणि अचूक कॉमिक टायमिंगनं प्रेक्षकांच्या मनात कायमचं स्थान निर्माण केलं आहे. त्यांच्या भन्नाट व्यक्तिरेखांमुळे आणि संस्मरणीय स्किट्समुळे 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा कार्यक्रम आज प्रत्येक मराठी घरातील आनंदाचा आणि कौटुंबिक मनोरंजनाचा अविभाज्य भाग आहे. प्रेक्षकांना नेहमीच काहीतरी नवं, वेगळं आणि अधिक मनोरंजक देण्याची परंपरा 'सोनी मराठी' आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' यांनी कायम जपली आहे. प्रेक्षकांच्या भरभरून प्रेमामुळे आणि त्यांच्या वाढत्या मागणीमुळे यंदा हास्यजत्रा आणखी एका मोठ्या बदलासह प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

### वसतिगृहात व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

पुणे : दैनिक संध्या

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मुला- मुलींच्या शासकीय वसतिगृहात सन २०२६- २७ या शैक्षणिक वर्षाकरिता व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया शुक्रवारपासून प्रक्रिया सुरू होणार आहे. जिल्ह्यात एकूण २६ मागासवर्गीय मुला- मुलींची शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यामध्ये १५ मुलांची व ११ मुलींची वसतीगृहे आहेत. पुणे व पिंपरी चिंचवड शहरांमध्ये एकूण १४ शासकीय वसतिगृहे असून त्यापैकी ९ मुलांची व ५ मुलींची वसतिगृहे आहेत. तसेच १२ शासकीय वसतिगृहे तालुकास्तरावर आहेत. वसतिगृह प्रवेश ऑनलाइन पद्धतीने होणार असून प्रवेशासाठी http://hmasnew.mahait.org या पोर्टलवर वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज १५ सप्टेंबर पर्यंत स्वीकारण्यात येणार असून २२ सप्टेंबर रोजी यादी प्रसिद्ध करण्यात येईल. इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे.

# "सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात आरोग्यविषयक जागरूकता आवश्यक"

## अमृता फडणवीस यांचे प्रतिपादन : 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' पुस्तकाची मराठी व इंग्रजी आवृत्ती प्रकाशित

■ पुणे (दै. संध्या)

"आजच्या तंत्रज्ञान केंद्रित युगात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आवश्यक आहेच, पण डिजिटल उपकरणांवरील वाढते अवलंबित्व, एकाच जागी बसून दीर्घकाळ काम करणे, बसण्याची चुकीची पद्धत आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे सध्या पाठीच्या व मानदुखीच्या समस्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, " असे मत दिविजा फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस यांनी मांडले. मणक्याचे आजार या विषयातील ख्यातनाम तज्ज्ञ डॉ. अजय कोठारी आणि डॉ. अभिनव भुते लिखित 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' या पुस्तकाच्या मराठी आणि इंग्रजी आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या.




संचेती रुग्णालयाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. पराग संचेती, उद्योजक सौरभ बोरा, मृणाल पवार, पुस्तकाचे दोन्ही लेखक, रमेश कोठारी आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

अमृता फडणवीस पुढे म्हणाल्या की, उपचारांपेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी ठरतो, मात्र प्रतिबंधाची सुरुवात जागरूकतेपासून व्हायला हवी. निरोगी व सक्रिय आयुष्यासाठी आपल्या शरीराला समजून घेणे आणि आरोग्याला पूरक अशा जीवनशैलीची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे. मणक्याच्या सुदृढतेसाठी जनजागृतीसह प्रतिबंधात्मक काळजी घेण्याकरिता हे पुस्तक महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्या म्हणाल्या.

मृणाल पवार म्हणाल्या, "आजची पिढी तंत्रज्ञानाशी सातत्याने जोडलेली आहे. पण ती स्वतःच्या आरोग्यापासून दूर जात आहे. मणक्याच्या आरोग्याविषयीची चर्चा ही केवळ वेदनांवरील उपचारांपुरती मर्यादित नसून, ती आयुष्यात संतुलन राखणे, जागरूकता निर्माण करणे आणि एकूण जीवनमान सुधारण्याशी संबंधित आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून दोन दिग्गज डॉक्टरांचे ज्ञान आणि तब्बल दोन दशकांचा वैद्यकीय अनुभव वाचकांसाठी सोप्या भाषेत उपलब्ध करून देण्यात आला आहे."

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रापुढील नव्या आव्हानांवर प्रकाश टाकताना डॉ. अजय कोठारी यांनी सांगितले की, मानदुखी व पाठीची दुखणी आता केवळ ज्येष्ठांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. स्क्रीनचा जास्त वापर, मैदानी हालचालींचा अभाव, व्यायामाची कमतरता, चुकीच्या पद्धतीने बसणे आणि अयोग्य जीवनशैली यामुळे तरुण वर्गात या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. समस्या गंभीर होण्यापूर्वी लोकांनी ती समजून घ्यावी आणि साध्या प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करावे, या उद्देशाने आम्ही हे पुस्तक लिहिले आहे.

मुख्य भाषणात डॉ. पराग संचेती यांनी आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली अत्यंत कमी झाल्याचे सांगत, सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करण्याचे आणि वेळेवर निदान व उपचारांसाठी नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले. निरोगी शरीरासाठी शिस्त, नियमित व्यायाम, शरीराचे योग्य वजन राखणे, पुरेशी विश्रांती आणि मानसिक शांती या पाच मूलभूत सूत्रांचा उल्लेख डॉ. संचेती यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण करंदीकर यांनी केले, तर डॉ. डिंपल कोठारी यांनी आभार मानले.

# मोरेपेन लॅबोरेटरीजचा विक्रमी तिमाही नफा; EBITDA २०७ टक्के, PAT मध्ये ३९४ टक्के वाढ

■ पुणे (दै. संध्या)

मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२७च्या पहिल्या तिमाहीत आतापर्यंतचा सर्वाधिक तिमाही महसूल आणि नफा नोंदवला आहे. कंपनीचा तिमाही महसूल ३४ टक्क्यांनी वाढून ५७५.३१ कोटी रुपयांवर पोहोचला. EBITDA मध्ये तब्बल २०७ टक्क्यांची वाढ होत तो ८७.७२ कोटी रुपये झाला, तर करानंतरचा नफा (PAT) ३९४ टक्क्यांनी वाढून ५६.३५ कोटी रुपयांवर पोहोचला. कंपनीच्या निर्यात महसुलात १११ टक्के वाढ झाली. API व्यवसायात ३१ टक्के, तर API निर्यातीत ४२ टक्के वाढ नोंदवण्यात आली. मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायानेही १९ टक्के वाढ नोंदवली. दरम्यान, कंपनीचा ८२५ कोटी रुपयांचा CDMO करार आता पूर्ण व्यावसायिक अंमलबजावणीच्या टप्प्यात दाखल झाला आहे. या अंतर्गत पहिल्या तिमाहीत ५८ कोटी रुपयांच्या व्यावसायिक पुरवठ्याची पूर्तता करण्यात आली. कंपनीच्या 'Morepen 2.0' धोरणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मोरेपेन लॅबोरेटरीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सुशील सुरी यांनी सांगितले की, तिमाहीतील विक्रमी कामगिरी कंपनीच्या परिवर्तनाच्या प्रवासाला बळ देणारी आहे. API व्यवसायातील सुधारणा, निर्यातीत वाढ आणि CDMO क्षेत्रातील विस्तारामुळे कंपनीच्या आगामी वाढीच्या संधी अधिक मजबूत झाल्या आहेत. कंपनीने सलग चौथ्यांदा USFDA तपासणी पूर्ण केली असून, Form 483 अंतर्गत कोणतीही निरीक्षण नोंद झालेली नाही.

# कीमतीचे दुसरे स्टोअर; महाराष्ट्रातील विस्ताराला नवी चालना

■ पुणे (दै. संध्या)

डिझाइन-केंद्रित लॅब-ग्रोन डायमंड ज्वेलरी ब्रँड 'कीमती ज्वेल्स'ने पुण्यातील बाणेर येथे आपले नवीन स्टोअर सुरू केले आहे. अरमान कोठारी यांनी स्थापन केलेल्या या ब्रँडला कोठारी समूह, उद्योजक निखिल कामत आणि केविन शाह यांचे पाठबळ लाभले आहे.

या नव्या स्टोअरमुळे राज्यातील ब्रँडची ग्राहकांपर्यंत पोहोच आणखी मजबूत झाली आहे. मुंबईतील अंधेरी येथील फ्लॅगशिप स्टोअर आणि पुण्यातील खराडी येथील विद्यमान स्टोअरनंतर बाणेरमधील हे नवे स्टोअर महाराष्ट्रातील ब्रँडचे तिसरे रिटेल केंद्र ठरले आहे. भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या लक्झरी ग्राहक बाजारपेठांपैकी एक असलेल्या महाराष्ट्रात समकालीन फाईन ज्वेलरी अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला या विस्तारामुळे अधिक बळ मिळाले आहे.



पुण्यातील बाणेर येथील नवीन स्टोअरचे उद्घाटन हे कीमती ज्वेल्सच्या ओम्नीचॅनेल विस्ताराच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या नव्या स्टोअरमुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना ब्रँडच्या प्रमाणित (सर्टिफाइड) लॅब-ग्रोन डायमंड दागिन्यांच्या काळजीपूर्वक निवडलेल्या आकर्षक कलेक्शनचा अधिक सहजपणे लाभ घेता येणार आहे. ग्राहकांना उत्कृष्ट खरेदीचा अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या या स्टोअरमध्ये दैनंदिन वापरासाठीचे दागिने, विविध प्रसंगांसाठीची ज्वेलरी, वधूंसाठीचे खास दागिने तसेच आधुनिक डिझाइन आणि उत्कृष्ट कारागिरीचा संगम असलेले आकर्षक स्टेटमेंट पीसेस उपलब्ध आहेत.

कीमतीसाठी महाराष्ट्र ही सातत्याने महत्त्वाची आणि धोरणात्मक वाढीची बाजारपेठ ठरत आहे. वैयक्तिक शैलीसोबतच जाणीवपूर्वक आणि जबाबदार निवडींना प्राधान्य देणारे तरुण व्यावसायिक, उद्योजक आणि आधुनिक लक्झरी ग्राहक यांचा वाढता ग्राहकवर्ग या बाजारपेठेच्या वाढीस चालना देत आहे. महाराष्ट्रभर आपला विस्तार वाढवत, कीमती समकालीन फाईन ज्वेलरी अधिकाधिक ग्राहकांपर्यंत सहज उपलब्ध करून देत आहे. त्याचबरोबर, राज्यातील ग्राहकांशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याच्या दिशेनेही ब्रँड सातत्याने वाटचाल करत आहे.

# राजेंद्र सराफ यांना रोटरीचे दोन मानाचे पुरस्कार

## जागतिक वाश 'WASH' संस्थेच्या संचालकपदी निवड

■ पुणे (दै. संध्या)

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३१च्या २०२५-२६ वर्षाच्या गौरव पुरस्कार सोहळ्यात पर्यावरण संवर्धन व समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल रोटेरियन राजेंद्र साराफ यांचा दुहेरी सन्मान करण्यात आला. पूना क्लब सिनेमा हॉल येथे झालेल्या या सोहळ्यात त्यांना 'टॉप डायरेक्टर रँक १' हा पुरस्कार तसेच रोटरी इंटरनॅशनलचा 'Avenues of Service Award' प्रदान करण्यात आला.

पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकास आणि समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्ये केलेल्या प्रभावी योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

रोटरॅक्ट म्हणून सुरू झालेल्या समाजसेवेच्या प्रवासाला मिळालेली ही मोठी दाद असल्याची भावना राजेंद्र सराफ यांनी यावेळी व्यक्त केली.

याचवेळी राजेंद्र सराफ यांची २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी 'Water, Sanitation and Hygiene (WASH)' या जागतिक संस्थेच्या संचालकपदी (World Director) निवड झाल्याची घोषणा



करण्यात आली. या निवडीमुळे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य या विषयांवरील आंतरराष्ट्रीय उपक्रमांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत नेतृत्व करण्याची संधी त्यांना मिळणार आहे.

रोटेरियन राजेंद्रकुमार व्ही. सराफ यांनी संकल्पित केलेले 'ग्रीन वीक मिशन', हवामान बदलाच्या पुनर्संचयनाच्या आव्हानांविरुद्ध एकजूट आघाडी तयार करत आहे. हे मिशन निर्णायकपणे सिद्ध करते की, शाश्वतता हा काही दूरचा, अनिवार्य कॉर्पोरेट आदेश नाही, तर तो लहान, साप्ताहिक विजयांचा संग्रह आहे, जो प्रत्येक नागरिक मिळवू शकतो आणि जागतिक निराशेचे स्थानिक कृतीत रूपांतर करू शकतो. हे मिशन रोटरीच्या ७ व्या प्रमुख क्षेत्र असलेल्या पर्यावरणाला पाठिंबा देत आहे. या मिशनचे जगभरात ७५ प्रवर्तक आहेत व जवळपास १ लाख लोकापर्यंत हे पोचत आहे. या यशाचे श्रेय त्यांनी रोटरी प्रांत ३१३१च्या संपूर्ण पर्यावरण टीमला, विविध रोटरी क्लबच्या अध्यक्षांना आणि सर्व सहकाऱ्यांना दिले. तसेच प्रांतपाल रोटेरियन संतोष मराठे, फर्स्ट लेडी रोटेरियन डॉ. तनुजा मराठे आणि रोटरी रांत ३१३१ नेतृत्वाने दिलेल्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंब्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

देश-विदेशातील रोटरी तसेच बिगर रोटरी मित्रांकडून मिळालेल्या शुभेच्छा, प्रोत्साहन आणि सहकार्यामुळे समाजहिताचे कार्य अधिक व्यापक करण्याची प्रेरणा मिळत असल्याचेही सराफ यांनी नमूद केले. त्यांच्या या दुहेरी सन्मानाबद्दल आणि जागतिक पातळीवरील निवडीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व रोटरी क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# दुभंगलेले ओठ आणि टाळूच्या उपचारांसाठी ७ ऑगस्टला मोफत शस्त्रक्रिया शिबिर

■ पुणे (दै. संध्या)

पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र येथे जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू या व्यंगाने ग्रस्त बालकांसाठी मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शुक्रवार, दि. 7 ऑगस्ट 2026 रोजी "मिशन स्माईल आणि कोटक महिंद्रा" यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे. हे शिबिर डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या हाय-टेक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील पुनर्रचनात्मक (प्लास्टिक) शल्यचिकित्सा विभागातील बाह्यरुग्ण विभाग, OPD क्र. 5 A येथे सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत होणार आहे. जन्मतः दुभंगलेले व फाटलेले ओठ तसेच टाळू असलेल्या बालकांना योग्य उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. शिबिरात तपासणी झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी आंतररुग्ण विभागात दाखल केले जाईल. तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्व प्रयोगशाळा चाचण्या, शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतरची काळजी आणि आवश्यक औषधे या सर्व सेवा पूर्णपणे मोफत पुरवण्यात येणार आहेत. याशिवाय, रुग्ण आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या एका नातेवाईकाच्या राहण्याची व जेवणाचीही मोफत सोय करण्यात आल्यामुळे गरजू कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. फाटलेले ओठ व टाळू यांसारख्या व्यंगांमुळे अनेक बालकांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते.

DPU — DR. D.Y. PATIL MEDICAL COLLEGE, HOSPITAL & RESEARCH CENTRE, PIMPRI, PUNE

■ शिबिराचे ठिकाण - पुनर्रचनात्मक (प्लास्टिक) शल्यचिकित्सा विभाग, बाह्यरुग्ण OPD क्र. 5 A, पहिला मजला, डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे

■ नोंदणीसाठी संपर्क क्रमांक: +91 70444 24477

# सौर ऊर्जेच्या आधारे कृषी सिंचनाचे महाराष्ट्र मॉडेल जागतिक पातळीवर उपयुक्त

## अपर मुख्य सचिव श्री. लोकेश चंद्र यांचे प्रतिपादन

■ पुणे (दै. संध्या)

मुख्यमंत्री सौर कृषी योजना २.० आणि मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याने सौर ऊर्जेच्या आधारावर कृषी सिंचनात लक्षणीय यश मिळविले आहे. त्यासोबत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासोबतच रोजगारनिर्मितीला मदत होत आहे. सौरऊर्जा वापराचे महाराष्ट्राचे हे मॉडेल देशातील अन्य राज्यांसोबतच जागतिक पातळीवरील विकसनशील राष्ट्रांसाठी उपयुक्त ठरले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बुधवारी मुंबईत केले. महावितरण, एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इनव्हेस्टमेंट बँक (एआयआयबी) आणि 'मित्रा' यांनी कृषी सिंचनासाठी सौरऊर्जेचा वापर या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना मा. लोकेश चंद्र बोलत होते. यावेळी 'मित्रा' या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, कृषी सल्लागार सुधीरकुमार गोयल, महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि संचालक (प्रकल्प) सचिन तालेवार उपस्थित होते. एआयआयबीचे वरिष्ठ गुंतवणूक अधिकारी प्रत्युष मिश्रा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी चर्चासत्रास उपस्थित होते.

मा. लोकेश चंद्र म्हणाले की, मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत ऊर्जावापरात नवीकरणीय उर्जेचा वाटा किमान ५० टक्के असावा, असे निश्चित केले आहे. मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिवसा व भरवशाचा वीज पुरवठा करण्यावर भर देतानाच शेतीसाठी नवीकरणीय ऊर्जेचा पुरवठा करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने मार्च २०२७ अखेर राज्यातील



कृषी सिंचनासाठी शंभर टक्के वीज पुरवठा सौरऊर्जेद्वारे करण्याचे नियोजन केले आहे.

त्यांनी सांगितले की, राज्यात आतापर्यंत ११ लाख सौर कृषी पंप आस्थापित करण्यात आले असून त्यामुळे ११ लाख शेतकऱ्यांना लाभ झाला असून ४० लाख एकर शेतीमध्ये सिंचनाची सुविधा निर्माण झाली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत आतापर्यंत सहा हजार मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी सिंचनासाठी सौर ऊर्जेच्या वापरामुळे शेतकऱ्यांना सिंचनाची भरवशाची सुविधा मिळण्यासोबतच हवामान बदलाच्या विपरित परिणामांचा सामना करण्यास मदत होते. ते म्हणाले की, सिंचनासाठी सौर ऊर्जा वापरण्यामुळे खर्चात मोठी बचत होते तसेच पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर होतो. ब्राझिल येथे जागतिक हवामान परिषदेत महाराष्ट्राचे सिंचनासाठी सौर ऊर्जा वापराचे मॉडेल मांडल्यानंतर त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. विकसनशील देशांमध्ये या मॉडेलचा वापर करण्याबाबत महावितरणचा इंटरनॅशनल सोलर अलायन्ससोबत सामंजस्य करार झाला आहे. देशातील इतर राज्ये महाराष्ट्र मॉडेलचे अनुकरण करत आहेत. एआयआयबीच्या माध्यमातून इतर विकसिनशील राष्ट्रांमध्ये महाराष्ट्र मॉडेल राबवता येईल.

मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, सौर कृषी पंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली आहे. देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के पंप महाराष्ट्रात बसविण्यात आले आहेत. एका महिन्यात ४५,९११ सौर पंप बसवून राज्याने गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. त्यासोबत मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या माध्यमातून राज्यात ठिकठिकाणी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. या दोन योजनांमुळे ग्रामीण भागात फार मोठी आर्थिक गुंतवणूक होत असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट होत आहे. योजनेची अंमलबजावणी झालेल्या क्षेत्रातील अभ्यासात या दोन योजनांचा ग्रामीण भागात जीवनमान उंचावल्याचे दिसत आहे.

मा. प्रवीण परदेशी म्हणाले की, कृषी पंपांना ऊर्जा पुरविण्यासाठी कोळशाच्या वापरापासून नवीकरणीय ऊर्जेच्या वापराच्या परिवर्तनाच्या बाबतीत महाराष्ट्राने चांगले यश मिळविले आहे. 'मित्रा' या संस्थेने राज्यातील कृषी पंपांसह विविध बाबींची माहिती एकत्रित केली असून तिचा उपयोग अचूक धोरणात्मक निर्णयासाठी होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### तंत्रज्ञान आणि पोलिसांच्या चिकाटीचा संगम; २५ मोबाईल पुन्हा मालकांच्या हाती

**यवत : दैनिक संध्या**

गहाळ झालेला मोबाईल पुन्हा मिळणे हे अनेकांसाठी अशक्य वाटते. मात्र, यवत पोलिसांनी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करत ५ लाख ७५ हजार रुपये किमतीचे २५ गहाळ स्मार्टफोन शोधून त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन केले आहेत. या उल्लेखनीय कारवाईमुळे नागरिकांनी यवत पोलिसांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले आहे. पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी गहाळ मोबाईलच्या वाढत्या तक्रारींची दखल घेत गुन्हे प्रकटीकरण पथकाला विशेष शोधमोहीम राबविण्याचे निर्देश दिले. यानुसार पथकाने CEIR (Central Equipment Identity Register) पोर्टलच्या माध्यमातून महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये वापरात असलेल्या गहाळ मोबाईलचा शोध सुरू केला. तांत्रिक तपास, माहितीचे विश्लेषण आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्याच्या आधारे २५ स्मार्टफोन हस्तगत करण्यात आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांना परत देण्यात आले. हरविलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी यवत पोलिसांचे मनापासून आभार मानले. भविष्यातही गहाळ मोबाईल शोधून नागरिकांना परत मिळवून देण्यासाठी अशी मोहीम अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांनी दिली. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस आणि पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड तसेच पोलीस अंमलदार महेंद्र चांदणे, संदीप देवकर, रॉकी देवकाते, मारुती बाराते, धीरज जाधव, अमोल भुजबळ, सचिन गुंड, शुभम मुळे आणि दिनेश पोळ यांनी पार पाडली.

### एसुस कडून स्वातंत्र्यदिन 2026 निमित्त विशेष लॅपटॉप ऑफर्स

**पुणे : दैनिक संध्या**




तैवानमधील जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी एसुस भारताच्या स्वातंत्र्यदिनाचा उत्सव विविध उत्पादनांवरील आकर्षक ऑफर्ससह साजरा करत आहे. स्वातंत्र्यदिन विशेष सेल दरम्यान ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज एसुस लॅपटॉप्ससह आपल्या डिजिटल अनुभवाला नव्या उंचीवर नेण्याची उत्तम संधी मिळणार आहे. उच्च कार्यक्षमतेचे गेमिंग लॅपटॉप्स ते आकर्षक आणि उत्पादकता वाढविणारे प्रीमियम लॅपटॉप्सपर्यंत, एसुस आपल्या लोकप्रिय आरओजी, टीयूएफ, व्हिवोबुक आणि झेनबुक सिरीजवर आकर्षक सवलती आणि विशेष ऑफर्स देत आहे. मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध या विशेष ऑफरमध्ये ग्राहकांना एसुसच्या सर्वोत्तम कार्यक्षमतेच्या लॅपटॉप्सवर तब्बल 53% पर्यंत बचत करण्याची संधी मिळणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उत्कृष्ट कार्यक्षमता आणि नाविन्यपूर्ण वैशिष्ट्यांनी सज्ज लॅपटॉपमध्ये गुंतवणूक करण्यासाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. या मर्यादित कालावधीच्या ऑफर्स 16 ऑगस्टपर्यंत रिलायन्स डिजिटल, क्रोमा आणि विजय सेल्स या आघाडीच्या इलेक्ट्रॉनिक्स विक्री केंद्रांमध्ये उपलब्ध असतील. त्यामुळे ग्राहकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज एसुस लॅपटॉपवर अधिक सुलभपणे अपग्रेड करण्याची उत्तम संधी मिळणार आहे. सणासुदीच्या विशेष सवलतींसोबतच एसुस ग्राहकांना निवडक बँक कार्डांवर इन्स्टंट सवलती तसेच 12 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट ईएमआयचा लाभही मिळणार आहे. याशिवाय, या विशेष कालावधीत केवळ ₹99 पासून सुरू होणाऱ्या वॉरंटी एक्स्टेंशन प्लान्स आणि स्थानिक अपघाती नुकसान संरक्षण योजनाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामुळे या ऑफर्स अधिक आकर्षक ठरतात.

### स्मार्टफोन सुरक्षेसाठी एआय+ची ₹१०० कोटींची गुंतवणूक; प्रोजेक्ट ट्रस्ट+ची घोषणा

**पुणे : दैनिक संध्या**




भारतीय स्मार्टफोन क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल टाकत एआय+ स्मार्टफोन्सने 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' या नव्या उपक्रमाची घोषणा केली आहे. पुढील पाच वर्षांत दरवर्षी ₹२० कोटी, अशा एकूण ₹१०० कोटींची गुंतवणूक करून देशातील सर्वात सुरक्षित स्मार्टफोन इकोसिस्टम उभारण्याचा कंपनीचा मानस आहे. या उपक्रमांतर्गत एथिकल हॅकर्स, सुरक्षा संशोधक आणि डेव्हलपर्स यांना कंपनीच्या प्रणालींची चाचणी घेण्यासाठी, सुरक्षा त्रुटी शोधण्यासाठी आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्यापूर्वी त्या दूर करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कंपनीच्या मते, 'प्रोजेक्ट ट्रस्ट+' ही केवळ बग बाऊंटी योजना नसून पारदर्शकता, सहयोग आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांवर आधारित व्यापक सुरक्षा उपक्रम आहे. डिजिटल युगात सुरक्षित स्मार्टफोन तयार करण्यासाठी तंत्रज्ञान समुदायाचा सहभाग अत्यावश्यक असल्याचे एआय+ने स्पष्ट केले. याबाबत बोलताना एआय+ स्मार्टफोन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि NxtQuantum Shift Technologies चे संस्थापक माधव सेठ म्हणाले, "बहुतेक कंपन्या त्यांची उपकरणे सुरक्षित असल्याचा दावा करतात; आम्हाला ते कृतीतून सिद्ध करायचे आहे. सुरक्षा हा अंतिम टप्पा नसून सातत्याने विकसित होणारा प्रवास आहे. 'प्रोजेक्ट ट्रस्ट+'द्वारे आम्ही भारतातील तंत्रज्ञान समुदायासाठी आमचे दरवाजे खुले करत आहोत, कारण सर्वात सुरक्षित उत्पादने सामूहिक सहभागातूनच तयार होतात."

### पुण्यात टेकडीफोडीला लगाम घाला

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे शहराच्या विविध भागांत टेकड्या फोडून बांधकामे केली जात आहेत. त्यामुळे शहराचे पर्यावरणास धोका निर्माण झाला असून. बावधन, मार्केटयार्ड, धायरी आणि कात्रज परिसरातील टेकड्या फोडून सुरु असलेले बांधकाम त्वरित थांबवा, चुकीच्या पद्धतीने बांधकाम परवानग्या दिल्या असतील तर त्या रद्द करा असे निर्देशस्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिले आहेत. शहरात टेकड्या फोडून प्लॉटिंग आणि बांधकामे करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. टेकडीफोड, उत्खनन आणि नियमबाह्य विकासकामांची तातडीने चौकशी करून अहवाल सादर होईपर्यंत या कामांना स्थगिती देण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. तसेच, शहरातील सर्व टेकड्यांचे जीआयएस आधारित मॅपिंग करून त्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करा.

# लठ्ठपणावर मात करण्यासाठी बहुआयामी प्रयत्नांची गरज

## नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे आयोजित ओबेसिटी मास्टर क्लासमध्ये तज्ज्ञांचे मत

■ पुणे (दै. संध्या)




लठ्ठपणाला जगभरात अधिकृतरित्या एक आजार आणि प्रमुख सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.लठ्ठपणावर मात करण्यासाठी बहुआयामी दृष्टीकोनाची गरज असल्याचे मत विविध तज्ज्ञांनी व्यक्त केले.

नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटर तर्फे नुकतेच पुण्यातील शेरटन ग्रँड हॉटेल येथे द ओबेसिटी मास्टरक्लास (360°) -डीअ‍ॅन्डओ कॉन स्पेशल एडिशन 2026 ही दोन दिवसीय वैद्यकीय परिषद पार पडली. स्थूलपणा (ओबेसिटी) व्यवस्थापन आणि मेटाबोलिक मेडिसिनमधील अत्याधुनिक संशोधन व उपचारपध्दती याबाबत चर्चा करण्यासाठी या परिषदेला भारतासह विविध देशांतील आघाडीचे एंडोक्रिनोलॉजिस्ट, फिजिशियन, बॅरिएट्रिक सर्जन, आहारतज्ञ, संशोधक आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ञ यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये 75 आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांसह 500 हून अधिक डॉक्टर्स उपस्थित होते.

या परिषदेत लठ्ठपणाचा प्रतिबंध, निदान आणि दीर्घकालीन उपचारांसाठी बहुशाखीय आणि रूग्णकेंद्रित दृष्टीकोनावर विशेष भर देण्यात आला. परिषदेपूर्वी वैयक्तिक गरजांनुसार आहार नियोजन, शारीरिक हालचाल, वर्तनातील बदल आणि शाश्वत वजन व्यवस्थापन या विषयांवरील कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यानंतर भारत,डेन्मार्क,जपान आणि युनायटेड किंगडम मधील तज्ञांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. लठ्ठपणावरील औषधोपचार, बालवयातील लठ्ठपणा, मेटाबॉलिक शस्त्रक्रिया आणि उपचारातील नव्याने विकसित होत असलेल्या पध्दतींवर सखोल चर्चा करण्यात आली.

परिषदेत प्रख्यात तज्ज्ञ डॉ. बंशी साबू आणि डॉ.ब्रिजमोहन मक्कर यांचे बीजभाषण झाले. विविध सत्रांमध्ये लठ्ठपणामुळे हृदयरोग, फॅटी लिव्हर डिसीज, महिलांचे आरोग्य, झोपेचे विकार, मूत्रपिंडाचे आजार, मधुमेह आणि एकूणच चयापचय आरोग्याशी असलेली जोखीम यावर चर्चा करण्यात आली. बॉडी कॉम्पोझिशन अ‍ॅनालिसिस, इन्सुलिन पंप तंत्रज्ञान आणि कंटिन्युअस ग्लुकोज मॉनिटरिंग (सीजीएम) यावरील प्रात्यक्षिक कार्यशाळा आणि चर्चासत्रांमध्ये प्रतिनिधींनी सहभाग घेतला. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप माने, उपव्यवस्थाकीय संचालक डॉ.दिविज माने, समूह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे,सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर ओबेसिटी, मेटाबॉलिक डिसीजेस अँड अ‍ॅडव्हान्स्ड बॅरिएट्रिक सायन्सेसच्या प्रोग्राम डायरेक्टर व आयोजन समितीच्या प्रमुख डॉ.रीमा काशिवा आणि बॅरिएट्रिक सर्जन डॉ. परमेश्वर बंबरुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

नोबल हॉस्पिटल्स अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरचे उपव्यवस्थाकीय संचालक डॉ.दिविज माने म्हणाले की,लठ्ठपणाला आता एक आजार म्हणून अधिकृतरित्या ओळखले जाऊ लागले असून त्यासाठी पुराव्यावर आधारित उपचार पध्दती,सहयोग आणि रूग्णांना निरंतर सेवा या सर्व गोष्टींची गरज आहे.ओबेसिटी मास्टर क्लासमुळे या विषयाबाबत ज्ञान, जागतिक पातळीवरच्या सर्वोत्कृष्ट पध्दतींबाबत देवाण-घेवाण शक्य झाली असूद यामुळे रूग्ण परिणामांमध्ये सुधार होण्यास मदत होईल. डॉ.संजय पठारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## आर्थिक निकाल जाहीर

■ पुणे (दै. संध्या)

बर्जर पेंट्सच्या आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीचे निकाल जाहीर करण्यात आले. पश्चिम आशियातील संघर्षानंतरही महसूल आणि ऑपरेटींग नफ्यात दोन-अंकी वाढ दिसून आली. स्वतंत्र आधारावर २५ टक्क्यांहून अधिक आणि एकत्रित आधारावर २९ टक्क्यांहून अधिक वाढीसह करोत्तर नफ्यामध्ये (पीएटी) प्रबळ वाढ दिसून आली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ऑपरेशन्समधून मिळालेला महसूल ३,५८३.८ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ३,२००.८ कोटी रूपयांच्या तुलनेत १२.० टक्के वाढ झाली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए (इतर उत्पन्न वगळून) ६०७.४ कोटी रूपये होता.

## सनकाइंड इंडियाला २५० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या ऑर्डर्स

■ पुणे (दै. संध्या)

**आर्थिक वर्ष २०२६-२७ ची दमदार सुरुवात**

एकात्मिक नवीकरणीय ऊर्जा ईपीसी आणि स्वच्छ ऊर्जा उपाय पुरवणाऱ्या सनकाइंड इंडिया लिमिटेडला आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मोठे यश मिळाले आहे. कंपनीला जुलै २०२६ पर्यंत सुमारे २५० मेगावॅट क्षमतेच्या वितरित मुक्त प्रवेश (डिस्ट्रीब्युटेड ओपन ॲक्सेस) सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अनेक ईपीसी ऑर्डर्स प्राप्त झाल्या आहेत. हे प्रकल्प छत्तीसगड, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये उभारले जाणार असून, स्टील, पॅकेजिंग, उत्पादन उद्योग तसेच स्वतंत्र वीज उत्पादक क्षेत्रातील व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांसाठी ते राबवले जाणार आहेत. या ऑर्डर्समुळे कंपनीचे ऑर्डर बुक आणि देशभरातील अंमलबजावणीची क्षमता अधिक बळकट झाली आहे.

कंपनीच्या मते, या ऑर्डर्समुळे व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांमध्ये ऊर्जा खर्च कमी करणे, ऊर्जा सुरक्षितता वाढवणे आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वितरित मुक्त प्रवेश सौर ऊर्जेचा स्वीकार वेगाने वाढत असल्याचे स्पष्ट होते. याबाबत प्रतिक्रिया देताना सनकाइंड इंडिया लिमिटेडचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक हनिश गुप्ता म्हणाले, "सुमारे २५० मेगावॅट क्षमतेच्या नव्या ऑर्डर्समुळे ग्राहकांचा आमच्या अभियांत्रिकी क्षमता, गुणवत्तापूर्ण काम आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याच्या क्षमतेवर असलेला विश्वास अधोरेखित झाला आहे. नवीकरणीय ऊर्जा आता उद्योगांच्या दीर्घकालीन धोरणाचा महत्त्वाचा भाग बनत असून, त्यातून सातत्याने मोठी मागणी निर्माण होत आहे." कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विरपाल यादव यांनी सांगितले की, "वाढते ऑर्डर बुक हे सनकाइंडच्या मजबूत ईपीसी क्षमतेचे आणि शिस्तबद्ध अंमलबजावणीचे प्रतीक आहे. अभियांत्रिकी, खरेदी, प्रकल्प व्यवस्थापन आणि बांधकाम क्षेत्रातील अनुभवी पथकाच्या बळावर आम्ही एकाच वेळी अनेक प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यास सक्षम आहोत." नवीन प्रकल्पांमध्ये विविध राज्यांतील ग्राउंड-माउंटेड वितरित मुक्त प्रवेश सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश असून, त्यामुळे कंपनीच्या प्रकल्प पोर्टफोलिओमध्ये आणखी विविधता आली आहे. यासोबतच भारतातील वेगाने वाढणाऱ्या नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील कंपनीचे स्थान अधिक मजबूत झाले आहे. गेल्या काही वर्षांत सनकाइंडने पारंपरिक ईपीसी सेवांबरोबरच सौर प्रकल्पांसाठी माउंटिंग स्ट्रक्चर्सचे उत्पादन, नवीकरणीय ऊर्जा मालमत्ता व्यवस्थापन आणि एकात्मिक स्वच्छ ऊर्जा उपाय या क्षेत्रांतही विस्तार केला आहे. स्टील, उत्पादन, कापड, अन्न प्रक्रिया, पॅकेजिंग आणि पायाभूत सुविधा अशा विविध उद्योगांतील ग्राहकांना कंपनी सेवा पुरवत आहे.

सरकारी प्रोत्साहन, हरित ऊर्जेची वाढती मागणी, वितरित मुक्त प्रवेश मॉडेलचा वाढता स्वीकार आणि ऊर्जा साठवण तंत्रज्ञानातील गुंतवणूक यामुळे भारतातील नवीकरणीय ऊर्जा क्षेत्राला वेग आला असून, विश्वासार्ह आणि कार्यक्षम स्वच्छ ऊर्जा उपायांद्वारे देशाच्या ऊर्जा परिवर्तनात योगदान देण्याचा कंपनीचा निर्धार असल्याचे सनकाइंडने स्पष्ट केले आहे.

## एसुसने 'क्रोमबुक सीएक्स15' लाँच केला; एआय-सक्षम लॅपटॉपची किंमत ₹47,990

■ पुणे (दै. संध्या)




तैवानची आघाडीची तंत्रज्ञान कंपनी एसुसने भारतातील आपल्या क्रोमबुक उत्पादन श्रेणीचा विस्तार करत नवीन एसुस क्रोमबुक सीएक्स15 (सीएक्स1505सीटीए) सादर केला आहे. विद्यार्थी, युवा व्यावसायिक आणि प्रथमच लॅपटॉप खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेल्या या लॅपटॉपमध्ये क्रोमओएस, गुगल एआय आणि सुरक्षित क्लाउड-आधारित संगणकीय अनुभवाची सुविधा देण्यात आली आहे.

या लॅपटॉपची किंमत ₹47,990 असून तो एसुस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स, आरओजी स्टोअर्स, अधिकृत विक्रेते, रिलायन्स डिजिटल, एसुस ई-शॉप आणि देशभरातील प्रमुख रिटेल स्टोअर्समध्ये उपलब्ध असेल.

क्रोमओएसवर आधारित असलेला एसुस क्रोमबुक सीएक्स15 हा हलक्या आणि मजबूत डिझाइनसह विश्वासार्ह कार्यक्षमता, स्मार्ट उत्पादकता, दर्जेदार मनोरंजन आणि एंटरप्राइझ-स्तरीय सुरक्षा प्रदान करतो. गुगलच्या परिसंस्थेशी सहज जोडणीमुळे संशोधन, ऑनलाइन शिक्षण, सादरीकरणे तयार करणे आणि टीमसोबत सहयोग करणे यांसारखी दैनंदिन कामे अधिक सुलभ होतात. या लॅपटॉपमध्ये गुगलच्या नव्या एआय सुविधांचा समावेश करण्यात आला असून, वापरकर्त्यांना अधिक कार्यक्षमतेने काम करण्याबरोबरच भविष्यातील गरजांसाठी उपयुक्त एआय कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते.

खरेदी अधिक सुलभ करण्यासाठी एसुस इझी पे अंतर्गत शून्य टक्के व्याजदरासह दरमहा ₹3,999 पासून ईएमआयची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय ग्राहकांना एक वर्षाची मानक वॉरंटी आणि एक वर्षाचे अपघाती नुकसान संरक्षणही दिले जाणार आहे. यावेळी एसुस इंडिया, ग्राहक व गेमिंग व्यवसाय विभागाचे उपाध्यक्ष आर्नोल्ड सु म्हणाले, "डिजिटल शिक्षण, संमिश्र कार्यपद्धती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे संगणकीय वापराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. अशा वेळी साधा, सुरक्षित आणि बुद्धिमान अनुभव देणाऱ्या उपकरणांची मागणी वाढत आहे. एसुस क्रोमबुक सीएक्स15च्या माध्यमातून आम्ही हा अनुभव अधिक परवडणारा आणि व्यापक ग्राहकवर्गापर्यंत पोहोचवत आहोत. तसेच भारतातील ऑफलाइन किरकोळ बाजारपेठेत क्रोमबुकचा विस्तार करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल आहे."

## ताडपत्रीखाली अंत्यसंस्कार

■ वेल्हे (पुणे) (दै. संध्या)

राजगड तालुक्यातील खोपडेवाडी गावात भर पावसात स्मशानभूमी अभावी नागरिकांची मृत्यूनंतरही परवड सुरू आहे. ताडपत्रीखाली अंत्यसंस्कार करण्याची वेळ बुधवार (ता.०५) रोजी आली असून ग्रामस्थांची अनेक वर्षापासून ची मागणी लोकप्रतिनिधींच्या व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. राजगड किल्ल्याच्या परिसरामध्ये खोपडेवाडी गाव आहे या गावातील ज्येष्ठ महिला बाळाबाई लक्ष्मण जोरकर वय वर्ष 80 यांचा मृत्यू मंगळवार (ता.04) रोजी सायंकाळच्या सुमारास झाला.

## 'एमटीपीए'च्या अध्यक्षपदी अ‍ॅड. ज्ञानेश्वर नरवाडे

■ पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) अध्यक्षपदी अ‍ॅड. ज्ञानेश्वर नरवाडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वर्ष २०२६-२७ साठी नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अ‍ॅड. नरवाडे यांच्यासह उपाध्यक्षपदी अ‍ॅड. प्रणव शेठ, सचिवपदी मिलिंद हेंद्रे, सहसचिवपदी कैलास काशीद आणि खजिनदारपदी सीएमए नवनाथ नलावडे यांची निवड झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष अ‍ॅड. ज्ञानेश्वर नरवाडे यांनी सभासदांचे आभार मानत, संस्थेची उज्ज्वल परंपरा जपत अधिक दर्जेदार, अभ्यासपूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. कर सल्लागारांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी अधिकाधिक स्टडी सर्कल्स, सेमिनार्स आणि प्रशिक्षण कार्यक्रम केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यातील विविध भागांत आयोजित केले जातील, असे त्यांनी सांगितले.

# श्रेया कालरा 'लॉक अप: सच या सजा'ची विजेती

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

सत्य खरंच तुम्हाला मुक्त करू शकतं. लॉक अप: सच या सजा या नेटफ्लिक्सच्या कैद रिॲलिटी शोमध्ये हे अक्षरशः सिद्ध झालं, ज्याने पहिल्या दिवसापासूनच प्रेक्षकांना खिळवून ठेवलं. सहा आठवड्यांच्या भावनिक कबुलीजबाब, चार्जशीट्स, स्फोटक वाद, बदलणारे समीकरण आणि अविस्मरणीय रिडेम्प्शन आर्क्सनंतर नेटफ्लिक्स आणि बालाजी टेलिफिल्म्सच्या रेकॉर्डब्रेकिंग कैद रिॲलिटी फिनॉमेननला विजेती मिळाली. कैदी श्रेया कालरा विजयी ठरली, तिने सीझनमधील सर्वात कठीण टास्क्स, सततची चौकशी आणि बदलणारे समीकरण पार करत दाखवले की तिची खरी ताकद म्हणजे प्रामाणिकपणा. लॉक अप मध्ये एका व्यक्ती म्हणून प्रवेश करून, सत्य स्वीकारत बाहेर पडण्याचा तिचा प्रवास देशभरातील प्रेक्षकांना भिडला आणि अखेरीस तिला विजेतेपद मिळवून दिलं.

कैद रिॲलिटी फॉरमॅट म्हणून सुरू झालेला हा शो लवकरच भारतातील सर्वाधिक चर्चेतला शो ठरला, एक वेड म्हणावं असं. 27 जून रोजी पाच दिवसांच्या आठवड्याच्या सीरिज म्हणून प्रीमियर झालेला लॉक अप: सच या सजा अभूतपूर्व यशस्वी ठरला. प्रेक्षकांच्या मागणीनुसार तो आधी सहा दिवसांवर विस्तारला आणि




अखेरीस आठवड्याचे सातही दिवस स्ट्रीम होऊ लागला. फक्त तीन आठवड्यांत या सीरिजने 50 मिलियन व्ह्यूइंग अवर्स पार केले, तर शोभोवतीच्या चर्चांनी सोशल मीडियावर स्फोट घडवला, आजपर्यंत 3.3 बिलियन सोशल मीडिया व्ह्यूज आणि 5 मिलियन संभाषणं निर्माण केली.

हिट सीरिजपेक्षा अधिक, लॉक अप: सच या सजा एक सांस्कृतिक फिनॉमेनन ठरला. सोळा कैदी राम कपूर, शिवांगी जोशी, धीरज धूपर, हर्षद चोपडा, शिल्पा शिंदे, सुनीता आहुजा, पामाला सेरेना, माधुरी ग्रोवर, श्रेस्ता अय्यर, आकांक्षा चमोला, आकांक्षा चौधरी, योगेश रावत, सूफी मोटीवाला, श्रेया कालरा, वरुण यादव आणि रियाज अली एका ध्येयाने लॉक अप मध्ये प्रवेश केला. त्यांच्या वन-लायनर्स इंटरनेटवर कॅचफ्रेज झाले; त्यांच्या स्पर्धा अनंत चर्चांना कारणीभूत ठरल्या; आणि प्रत्येक चार्जशीट, कबुलीजबाब व एव्हिक्शन सोशल मीडिया टाइमलाइन्सवर वर्चस्व गाजवत राहिले.

रितेश देशमुख आणि फराह खान यांनी या कैद्यांचं आणि त्यांच्या नखऱ्यांचं व्यवस्थापन उत्कृष्टपणे केलं. मित्र म्हणून त्यांच्यासोबत राहणं, त्यांना समज देणं आणि प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणं या दोन्ही जेलर्सनी आपली उपस्थिती ठळकपणे जाणवून दिली आणि शोला मोठी किंमत वाढवून दिली.

शेवटी एका कैद्याने आपली क्षमता सिद्ध केली आणि विजेतेपदाची ट्रॉफी उचलली. श्रेया कालरा म्हणाली, "लॉक अप: सच या सजा मधला अनुभव मला कायमचा बदलून गेला. मी इथे परफेक्ट होण्यासाठी आले नव्हते, मी खरी राहण्यासाठी आले होते. प्रामाणिक राहणं मला आज विजेती बनवलं आणि हा माझ्या आयुष्यातला सर्वात अभिमानाचा क्षण आहे. लोकांनी मला मोठ्या आवाजात बोलणारी, वादग्रस्त आणि कठीण म्हटलं, पण मी कधीच स्वतःला बदललं नाही. ही ट्रॉफी त्या सगळ्यांची आहे ज्यांना सत्य बोलल्यामुळे न्याय करण्यात आलं. माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सगळ्यांचे आभार. ही फक्त सुरुवात आहे. नेटफ्लिक्स आणि एकता मॅडम यांचे मी मनापासून आभार मानते की त्यांनी मला माझं खरं रूप जगासमोर मांडण्याचं व्यासपीठ दिलं."

मोनिका शेरगिल, व्हाइस-प्रेसिडेंट कंटेंट, नेटफ्लिक्स इंडिया म्हणाल्या, "सहा आठवडे सलग लॉक अप: सच या सजा भारतातील सर्वाधिक चर्चेतला शो ठरला. शो आणि त्याचे कैदी यांनी प्रेक्षकांमध्ये प्रचंड फॅन्डम्स निर्माण केले, रोजच्या जीवनाचा भाग बनले आणि लाखो प्रेक्षकांसाठी सांस्कृतिक संभाषण ठरले. सोशल मीडिया फीड्सपासून डिनर टेबल चर्चांपर्यंत, ऑफिसमधल्या वॉटर कूलर गप्पांपर्यंत, प्रेक्षक प्रत्येक मैत्री, प्रत्येक वाद आणि प्रत्येक ट्विस्टमध्ये गुंतलेले होते, ज्यामुळे हे सिद्ध झालं की लॉक अप मधल्या ड्रामापासून त्यांना पुरेसं मिळत नव्हतं."

या सोशल एक्सपेरिमेंटच्या केंद्रस्थानी स्वतःचं सत्य स्वीकारणं आणि आपण कोण आहोत यासाठी उभं राहणं हा मुख्य विचार होता! यामुळे आलेल्या प्रामाणिकपणाला प्रेक्षकांनी खूप पसंत केलं आणि आमचे अप्रतिम कैदी या लॉक अपमधल्या सर्वात कठीण आणि अविस्मरणीय परिस्थितींमधून पुढे जाताना त्यांनी जोरदार टाळ्या वाजवल्या. पहिल्या सीझनमध्ये विजेतेपद मिळवल्याबद्दल श्रेया कालराला हार्दिक शुभेच्छा.

## थोडक्यात पण महत्वाचे



### रोटरी पिंपरी टाऊनकडून विद्यार्थ्यांना रोटरी स्टडी ऍपचे वितरण

**पिंपरी : दैनिक संध्या**

रोटरी क्लब ऑफ पिंपरी टाऊनतर्फे तळवडे येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलमधील दहावीच्या १०५ विद्यार्थ्यांना रोटरी स्टडी ॲप वितरण करण्यात आले. तसेच शाळेच्या सुरक्षिततेसाठी शाळा अग्नीरोधक संच भेट देवून मदतीचा हात दिला. यावेळी क्लबचे अध्यक्ष संतोष भालेकर, सहाय्यक प्रांतपाल प्रदीप खेड़कर, माजी अध्यक्ष विल्सन जोसफ, सचिव प्रशांत पवार, फर्स्ट लेडी दीपा भालेकर, संजय थम्मन, विनोद कालेकर, नितीन सोनवणे आणि प्रसाद वाळके, संस्था अध्यक्ष गोविंद दाभाडे, सचिव मोटे,स्वप्नील पवार, मुख्याध्यापक एकनाथ आंबले तसेच शाळेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी क्लबकडून इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



### हिंजवडी आयटी पार्कमध्ये एनएसजी आणि अमेरिकन सैन्याकडून संयुक्त 'मॉक ड्रिल'

**पिंपरी : दैनिक संध्या**

हिंजवडी आयटी पार्क परिसरात सुरक्षा यंत्रणांची सज्जता, समन्वय आणि आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद क्षमता तपासण्यासाठी नॅशनल सिक्युरिटी गार्ड (एनएसजी) आणि युनायटेड स्टेट्स आर्मीच्या सैनिकांनी संयुक्तपणे भव्य मॉक ड्रिलचे आयोजन केले. या सरावाचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहेत. बुधवारी दुपारी ४ ते रात्री ९ या वेळेत तब्बल पाच तास चाललेल्या या सरावात १०० हून अधिक एनएसजी कमांडोज, अमेरिकन सैन्याचे १७ जवान, महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथक (एटीएस), पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध सुरक्षा आणि तपास यंत्रणांनी सहभाग घेतला. माण-हिंजवडी परिसरातील एका आयटी कंपनीच्या आवारात अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज कमांडोज, लष्करी वाहनांचा ताफा आणि कडक सुरक्षा व्यवस्था पाहून स्थानिक नागरिक व कर्मचाऱ्यांमध्ये काही काळ उत्सुकतेसोबतच भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र हा पूर्वनियोजित सुरक्षा सराव असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. संभाव्य दहशतवादी हल्ला, ओलीस संकट किंवा इतर गंभीर आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास विविध सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय साधून तातडीने कारवाई कशी करायची, नागरिकांची सुरक्षित सुटका कशी करायची आणि परिस्थितीवर नियंत्रण कसे मिळवायचे याची प्रत्यक्ष चाचणी या मॉक ड्रिलद्वारे घेण्यात आली. या संयुक्त सरावामुळे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय अधिक बळकट होण्यास मदत होणार असून, भविष्यातील कोणत्याही सुरक्षाविषयक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी यंत्रणांची तयारी अधिक सक्षम होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### मोशी कचरा डेपोतील बायो-सीएनजी प्रकल्पावरून वाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-महापालिकेच्या वतीने सार्वजनिक खासगी भागीदारी (डीबीएफओटी) तत्त्वावर ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प मोशी कचरा डेपोत राबवण्यात येत आहे. त्यासाठी मर्जीतील ठेकेदाराला १ हजार ५० रुपयांऐवजी तब्बल ३ हजार ६६१ रुपये प्रतिटन दराने टिपींग चार्जेस तब्बल १५ वर्षांसाठी काम देण्यात येणार आहे. राजकीय दबावातून आयुक्तांनी त्या प्रकल्पास मान्यता दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचे कारण पुढे करून या कामास स्थायी समितीकडून ऐनवेळी मान्यता देण्याचा घाट घालण्यात आला आहे. या प्रकल्पाआडून महापालिका लुटण्याचा डाव असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या स्थायी समिती सदस्यांनी केला आहे. मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा बळी गेला. ती घटना ताजी असताना महापालिकेकडून मोशी डेपोतच नवीन प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यावरून विरोधकांनी आयुक्तांसह सत्ताधारी भाजपला धारेवर धरले. कचऱ्यातून मलिदा लाटण्यासाठी मूळ दरापेक्षा तिपटीपेक्षा अधिक दराने प्रकल्प राबवला जात आहे. त्यातून महापालिकेची लूट होणार असून, करदात्यांच्या पैशांवर डल्ला मारण्यासाठी प्रकल्प राबवला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्थायी समितीचे सदस्य संदीप वाघेरे व सुलभा उबाळे यांनी पत्रकार परिषदेत हे गंभीर आरोप केले आहेत. या वेळी समिती सदस्य विकास साने, नगरसेवक राजू बनसोडे उपस्थित होते. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे हे गैरहजर असल्याने त्या प्रस्तावाला ऐनवेळी मंजुरी देण्यात आली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### कासारवाडीत स्वच्छतागृहाच्या पाण्याने महापालिकेची गाडी धुतल्याचा आरोप

**पिंपरी : दैनिक संध्या**

एकीकडे शहरातील अनेक सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये पाण्याचा तुटवडा असल्याने ती वेळेवर स्वच्छ केली जात नाहीत. परिणामी दुर्गंधी, अस्वच्छता आणि गैरसोयीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कासारवाडी येथील कचरा संकलन केंद्राजवळ महापालिकेची गाडी स्वच्छतागृह साफ करणाऱ्या वाहनातील पाण्याने भररस्त्यात धुतली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, महापालिकेच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कासारवाडी येथील कचरा संकलन केंद्राजवळ महापालिकेची एक चारचाकी गाडी उभी करून होजपाईपद्वारे तिची धुलाई केली जात असल्याचे छायाचित्रांमधून दिसून येते. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या धुलाईसाठी वापरण्यात आलेले पाणी स्वच्छतागृह साफ करणाऱ्या वाहनातून घेतले जात होते. त्यामुळे स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी वापरल्या जाणाऱ्या संसाधनांचा अशा प्रकारे वापर होत असल्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# पिंपरी-चिंचवडला स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालय!

## आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश : मंत्रिमंडळाचा निर्णय; वाहतूक प्रकरणांच्या जलद निपटाऱ्याचा मार्ग मोकळा




"पिंपरी-चिंचवड हे राज्यातील वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहराच्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयाची मागणी सातत्याने शासनाकडे मांडली होती. राज्य सरकारने ती मान्य केल्याने नागरिकांना जलद, सुलभ आणि स्थानिक पातळीवर न्याय मिळेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य मंत्रिमंडळाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी माझा पाठपुरावा यापुढेही कायम राहील."

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

- पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालयाला मंजुरी.
- आमदार महेश लांडगे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश.
- १२ नवीन पदांना आणि सुमारे १.२७ कोटी खर्चाला मान्यता.
- मोटार वाहन प्रकरणांचा स्थानिक पातळीवर जलद निपटारा.
- नागरिक, पोलीस आणि वकिलांची वेळ, खर्च वाचणार; न्यायप्रक्रियेला गती मिळणार.

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरासाठी स्वतंत्र विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून, शहराच्या न्यायिक आणि प्रशासकीय विकासाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे. या निर्णयामागे भाजपा आमदार महेश लांडगे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि शासन स्तरावरील प्रभावी समन्वय निर्णायक ठरला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, वाहनांची प्रचंड वाढ, वाढते अपघात आणि मोटार वाहन कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या लक्षात घेता स्वतंत्र विशेष न्यायालयाची मागणी सातत्याने केली जात होती. आतापर्यंत अशी प्रकरणे पुणे न्यायालयात चालत असल्याने नागरिक, पोलीस यंत्रणा आणि वकिलांना मोठा वेळ व खर्च सहन करावा लागत होता.

आमदार महेश लांडगे यांनी ही बाब राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच, राज्य शासन, विधी व न्याय विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून, राज्य मंत्रिमंडळाने पिंपरी-चिंचवड येथे विशेष मोटार वाहन न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायालयाच्या स्थापनेसाठी आवश्यक १२ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये प्रथम वर्ग न्यायाधीश, लघुलेखक, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक तसेच शिपाई आदी पदांचा समावेश आहे. यासाठी सुमारे १.२७ कोटी रुपयांच्या खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या न्यायालयामुळे मोटार वाहन कायद्याशी संबंधित प्रकरणांचा स्थानिक पातळीवर जलद निपटारा होणार आहे. अपघात, वाहतूक नियमभंग, विमा दावे आणि अन्य वाहनविषयक प्रकरणांमध्ये नागरिकांना तातडीने न्याय मिळण्यास मदत होईल. तसेच पोलिसांचा वेळ वाचून न्यायालयीन प्रक्रियेत अधिक कार्यक्षमता येणार आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये रस्त्यांची दुर्दशा; खड्डे युद्धपातळीवर बुजवा

■ शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांची आयुक्तांकडे पत्राद्वारे मागणी

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये यंदाच्या पावसाळ्यात मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. शहरातील खड्डे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून युद्धपातळीवर बुजवण्यात यावेत. दोषी ठेकेदारांवर कडक कारवाई करण्याची मागणी शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांनी महापालिकेचे आयुक्त मा. डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. नगरसेवक विश्वजीत बारणे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, महानगरपालिकेने शहरात रस्ते विकासासाठी व दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला होता. मात्र, पावसाळ्याच्या अवघ्या काही दिवसांतच हे रस्ते उखडले असून सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असून महापालिकेच्या गुणवत्तेवर व नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. करदात्या नागरिकांच्या कष्टाचा कोट्यवधी रुपयांचा निधी अशा प्रकारे वाया जात असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे. रस्त्यांच्या



कडेला खडी पडल्यामुळे दुचाकीस्वारांचे लहान-मोठे अपघात सातत्याने होत आहेत. वाहनचालक, ज्येष्ठ नागरिक, महिला, शालेय विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाची कामे करूनही तेच ठेकेदार पुन्हा कामासाठी निवडले जात असल्याचा आरोप होत आहे. गेल्या अनेक वर्षांचा अनुभव पाहता, कामांच्या गुणवत्तेवर प्रशासनाचे कसलेही प्रभावी नियंत्रण राहिलेले नाही. त्यामुळेच वारंवार निकृष्ट कामे करणाऱ्या ठेकेदारांची आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे, असे बारणे यांनी आपल्या पत्रात स्पष्ट केले आहे.

## हिशोब हा व्यवसायाचा आत्मा : सीए गार्डी

■ निगडी (दै. संध्या)

वाणिज्य शाखेमधील अर्थशास्त्र हा एक महत्त्वाचा विषय आहे. ज्या क्षेत्रात पैशाचा संबंध येतो, तिथे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना संधी मिळते. हिशोब हा कोणत्याही व्यवसायाचा आत्मा असतो, तर पैसा हा रक्त आहे. रक्त थांबले तर व्यवसाय कोलमडतो. विद्यार्थ्यांना प्राप्त केलेल्या पदवीमुळे नोकरी मिळेल, पण कौशल्य अंगीकारले तर त्यांच्या करियरला योग्य आकार प्राप्त होईल. त्यामुळे फक्त पदवी मिळवणे पुरेसे नाही, तर वेगवेगळी कौशल्य अंगीकारणे गरजेचे आहे. असे मत आयसीएआय, पिंपरी चिंचवड शाखेचे माजी अध्यक्ष सनदी लेखापाल सुहास गार्डी यांनी व्यक्त केले. निगडी येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात "आंतरराष्ट्रीय वाणिज्य दिन"साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्राचार्या वंदना सोनोने, समन्वयक सुजाता बलकवडे, वंदना पांडे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बजेटवर लघु नाटिका सादर केली आणि संयुक्त भांडवल कंपन्याच्या करप्रणालीवर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन केले. सीए गार्डी पुढे म्हणाले की, कोणत्या क्षेत्रात जायचे ते ध्येय निश्चित करा आणि त्या मार्गावर आपली वाटचाल सुरु करा. कॉमर्स क्षेत्रात करियरच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. ज्या क्षेत्रात जायचे ध्येय निश्चित केले आहे, त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. समाजमाध्यमांमुळे माहिती घेणे किंवा शिकणे सोपे झाले आहे. मोबाईलवरील समाजमाध्यमांवर अनेक प्रलोभने दाखवली जातात परंतु, त्यांना बळी न पडता, मोबाईलचा अभ्यासासाठी योग्य वापर करणे गरजेचे आहे. चांगल्या मित्रांची संगत करणे, अवांतर वाचन करणे, आपले आदर्श कोण आहेत हे पाहणे. यांमुळे आपण ठरवलेले ध्येय गाठणे शक्य होईल.

**मॉडर्न महाविद्यालयात वाणिज्य दिन साजरा**



मुख्याध्यापिका सोनोने म्हणाल्या की, समाजकारण, राजकारण व अर्थकारणावर देशाची प्रगती अवलंबून असते. तरुणांनी आत्मनिर्भर होणे, आर्थिक साक्षर होणे गरजेचे आहे. व्यापार करणे म्हणजे केवळ नफा मिळविणे नाही, तर रोजगार देखील उपलब्ध करून देणे होय. देशाच्या अर्थव्यस्थेला बळ देण्यासाठी वाणिज्य शाखा महत्त्वाची भूमिका बजावते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक सुजाता बलकवडे यांनी केले. सूत्रसंचालन अनघा जोशी यांनी केले, तर आभार पूनम बागुल यांनी मानले. प्रमुख्याध्यापक योगेश ठिपसे यांनी या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य लाभले.

## टेंडर काढून टक्केवारी हवी असेल तर भीक मागून गोळा करून देतो

■ पण विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा करून शालेय साहित्य द्या!

■ प्रशासनाचा डीबीटीचा पारदर्शक प्रस्ताव भाजप नगरसेवकांनी फेटाळला

■ ठेकेदारांच्या फायद्यासाठी विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ – आम आदमी पार्टी युवक आघाडीचा आरोप

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील सुमारे ६० हजार गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदीसाठी 'डीबीटी' (DBT) द्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याचा पारदर्शक आणि विद्यार्थीहिताचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने (आयुक्तांनी) तयार केला होता. मात्र, विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा झाल्यास टेंडर, मध्यस्थी आणि कमिशनखोरीला वाव राहणार नाही, या स्वार्थातून भाजपच्या सत्ताधारी नगरसेवकांनी स्थायी समितीमध्ये हा प्रस्ताव फेटाळून लावला. मर्जीतील ठेकेदारांना लाभ मिळवून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात




आल्याचा आरोप आम आदमी पार्टी युवक आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविराज काळे यांनी केला आहे.

आम आदमी पार्टीने १९ जुलै २०२६ रोजी महापालिका आयुक्तांना ई-मेलद्वारे निवेदन देऊन, सुरू असलेली निविदा प्रक्रिया रद्द करून विद्यार्थ्यांच्या खात्यात डीबीटीद्वारे तातडीने रक्कम वर्ग करण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत २४ कोटी ९७ लाख रुपयांचा डीबीटी प्रस्ताव तयार केला. मात्र, स्थायी समितीने हा प्रस्ताव फेटाळून ई-रुपी आणि ठेकेदारीच्या माध्यमातून प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला. शाळा सुरू होऊन दोन महिन्यांहून अधिक काळ लोटला असतानाही ६० हजार विद्यार्थी आजही शालेय साहित्यापासून वंचित आहेत. प्रशासनाची इच्छा असूनही केवळ ठेकेदारधार्जिण्या भूमिकेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे. यावेळी रविराज काळे म्हणाले, "टेंडर काढून टक्केवारी हवी असेल तर ती आम्ही भीक मागून गोळा करून देऊ; पण विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ करू नका. विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट डीबीटीद्वारे रक्कम जमा करा आणि त्यांना तातडीने शालेय साहित्य उपलब्ध करून द्या." आम आदमी पार्टी युवक आघाडीची मागणी आहे की, स्थायी समितीने घेतलेला ठेकेदारधार्जिणा निर्णय तातडीने रद्द करून प्रशासनाच्या मूळ डीबीटी प्रस्तावाला मंजुरी द्यावी आणि विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी. अन्यथा, "टेंडरसाठी टक्केवारी हवी असेल तर आम्ही भीक मागून ती गोळा करून देतो," हा संदेश देत आम आदमी पार्टी युवक आघाडीच्या वतीने महापालिका भवनासमोर 'भीक मागो आंदोलन' करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी तडजोड करणाऱ्या या निर्णयाविरोधात तीव्र लोकआंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही रविराज काळे यांनी दिला.

## धरणे भरली तरी कासारवाडी जलतरण तलाव बंदच; पासधारकांची नाराजी

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारी धरणे तुडुंब भरून वाहत असतानाही कासारवाडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलतरण तलाव अद्यापही बंद असल्याने जलतरणपटू क्रीडाप्रेमी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पाणीकपातीच्या निर्णयानंतर जून महिन्यात बंद करण्यात आलेला हा तलाव जुलै आणि ऑगस्टमध्येही सुरू न झाल्याने नियमित सराव करणाऱ्यांसह वर्षभराचा पास काढलेल्या नागरिकांचे आर्थिक नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जून महिन्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने महापालिकेने शहरात १५ टक्के पाणीकपात लागू करत सर्व महापालिका जलतरण तलाव तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर जुलै व ऑगस्टमध्ये झालेल्या समाधानकारक पावसामुळे धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात जलसाठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे




तलाव पुन्हा सुरू होतील, अशी नागरिकांची अपेक्षा होती. मात्र, अद्यापही तलाव बंदच असल्याने नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या निर्णयाचा सर्वाधिक फटका राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांची तयारी करणाऱ्या जलतरणपटूंना बसत आहे. नियमित सराव खंडित झाल्याने त्यांच्या कामगिरीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, आरोग्यासाठी नियमित पोहणारे ज्येष्ठ नागरिक, व्यायामप्रेमी आणि लहान मुलांनाही याचा मोठा फटका बसला आहे. अनेकांना खासगी जलतरण तलावांचा पर्याय स्वीकारावा लागत असून, त्यासाठी अतिरिक्त आर्थिक खर्च करावा लागत आहे.

# शहरावार आधारित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी अमित शाह यांना निमंत्रण

**शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले निमंत्रण**

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराच्या ऐतिहासिक विकास प्रवासावर आधारित पुस्तकाच्या लोकार्पणासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण देण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी शहरात येण्याची विनंती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी शहा यांना निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असून त्याने आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. क्रांतिवीर चापेकर बंधूंची जन्मभूमी म्हणून ऐतिहासिक गौरव प्राप्त केलेल्या या शहराने औद्योगिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. स्मार्ट सिटी मिशन, मेट्रो प्रकल्प तसेच आधुनिक पायाभूत सुविधांच्या विकासामुळे या शहराची राष्ट्रीय ओळख अधिक बळकट झाली आहे.



या गौरवशाली आणि प्रेरणादायी विकास प्रवासाचे भावी पिढ्यांसाठी जतन करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सहकार्याने आणि अनुदानातून पिंपरी-चिंचवडच्या सुमारे ७५ वर्षांच्या इतिहास, विकास, सामाजिक, औद्योगिक, सांस्कृतिक व जनजीवनाशी संबंधित विविध पैलूंवर आधारित एक विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. हे पुस्तक शहराच्या ऐतिहासिक वारशाचे, विकास प्रवासाचे आणि त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीचे समग्र दस्तऐवज आहे. या पुस्तकाची एक प्रत आपल्या अवलोकनासाठी सादर करण्यात आली होती. पिंपरी-चिंचवड हे भारतीय जनता पक्षाचा एक महत्त्वाचा गड असून या शहराला वेळोवेळी आपले स्नेह, मार्गदर्शन आणि प्रेरणा लाभत आली आहे. पिंपरी-चिंचवडच्या नागरिकांची मनापासून इच्छा आहे की या महत्त्वपूर्ण पुस्तकाचे लोकार्पण आपल्या शुभहस्ते संपन्न व्हावे.

थोडक्यात पण महत्वाचे



## जेजुरी जयाद्री सोसायटीच्या अध्यक्षपदी अशोक गायकवाड

**जेजुरी : दैनिक संध्या**

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीतील जयाद्री विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते अशोक शुक्लेश्वर गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जेजुरी येथील जयाद्री सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब झगडे यांचा कार्यकाल संपल्याने पुरंदरच्या सहाय्यक सहकारी अधिकारी अमरीन बागवान यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी सोसायटीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब झगडे, उपाध्यक्षा रजनी पेशवे, संचालक संतोष उबाळे, हनुमंत खोमणे, संपत कोळेकर, संतोष दोरगे, रत्न माला झगडे, अनिल झगडे, कल्पना झगडे सचिव अजित जमदाडे आदी उपस्थित होते. अशोक गायकवाड यांनी या पूर्वी या सोसायटीच्या उपाध्यक्षपदी काम पाहिले आहे. जेजुरी नाभिक समाजाचे ज्येष्ठ नेते म्हणून त्यांनी समाजासाठी लोकपयोगी काम केले आहे. यावेळी नाभिक समाजाचे पदाधिकारी व श्री मार्तंड देवसंस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत, माजी नगरसेवक दिलीप गायकवाड, समाजाचे पदाधिकारी मल्हार राऊत,सुनील राऊत, उमेश गायकवाड, सनी राऊत, महेश गायकवाड, उघडा मारुती मंडळाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक सचिन पेशवे, व पदाधिकाऱ्यांनी अशोक गायकवाड अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांनी योग्य संगत निवडावी - सपोनि. मनोजकुमार नवसरे

**सोमेश्वरनगर : दैनिक संध्या**



विद्यार्थीदशेत असताना नेहमी चांगली संगत निवडावी. चुकीची संगत आयुष्य बरबाद करू शकते. अमली पदार्थांच्या सेवनाने गंभीर गुन्हे घडतात त्यामुळे त्यापासून दूर रहा असे आवाहन सुपे पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांनी केले. सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर विद्यालय आंबी बुद्रुक येथे अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले की सुरुवातीच्या काळात केवळ मजा म्हणून केलेले व्यसन नंतरच्या काळात उग्र स्वरूप धारण करते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांत प्रचंड ऊर्जा असते त्यामुळे या ऊर्जेचा सकारात्मक वापर करायला हवा. अमली पदार्थांच्या सेवनाने गंभीर अपघात होतात.अल्पवयीन मुलांचे गुन्हेगारीतील वाढते प्रमाण चिंताजनक आहे.रिल व रिअल आयुष्य वेगळी असून विद्यार्थ्यांनी आभासी दुनियेत जगू नये.असे आवाहन त्यांनी केले सायबर जनजागृती यावर बोलताना ते म्हणाले की या वयात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करावा.सर्व सोशल मीडिया साईट पासून दूर राहावे.अनोळखी व्हिडिओ कॉल उचलू नये.एपीके फाईल्स डाऊनलोड करू नये. ओटीपी कुणालाही सांगू नये. डिजिटल अवेअरनेस बाबत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांना माहिती द्यावी. वाहतुकीच्या नियमाबाबत बोलताना मनोजकुमार नवसरे म्हणाले की अल्पवयीन मुलांनी दुचाकी चालवल्यास पालकांवर गुन्हा दाखल होणार आहे. त्यांच्याकडून मोठा दंड वसूल होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाहने चालवू नयेत. मुलींना कुणीही त्रास देत असेल तर त्यांनी याबाबतची माहिती आपले पालक किंवा शिक्षकांना सांगावी.कुणी चुकीच्या ठिकाणी स्पर्श करत असेल तर त्याचा विरोध करून त्याची माहिती आपल्या पालकांना द्यावी. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप गार्डी, आंबी बुद्रुक च्या सरपंच शितल जगताप,विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार शिंदे, पोलीस कर्मचारी तुषार जैनक, सोमनाथ होले व निहाल वणवे, सारीका जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयातील शिक्षक हेमंत गडकरी यांनी केले.सूत्रसंचालन संतोष जेधे यांनी केले.

...............

## ७.४८ कोटी जाहिरातींसाठी... पण ग्राहक संघटनांकडे दुर्लक्ष?

**■ राजगुरूनगर (दै. संध्या)**



■ अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची नाराजी

महाराष्ट्र शासनाने ग्राहक जनजागृतीसाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता ७.४८ कोटींचा माध्यम आराखडा मंजूर केला आहे. ग्राहक जनजागृतीचा शासनाचा उद्देश स्वागतार्ह असला तरी प्रत्यक्ष ग्राहकांमध्ये जाऊन अनेक दशकांपासून जनजागृती करणाऱ्या नोंदणीकृत ग्राहक संघटनांना या आराखड्यात कोणतेही स्थान न दिल्याबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने नाराजी व्यक्त केली आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब सिताराम औटी यांनी मंत्रालयात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. ग्राहक जनजागृती केवळ प्रसारमाध्यमांतील जाहिरातींमधून होत नाही, तर ती गावागावांत प्रत्यक्ष संवाद, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि लोकसहभागातून अधिक प्रभावी होते, असे त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांनाही सविस्तर निवेदन देण्यात आले. ग्राहक जनजागृती अभियानात नोंदणीकृत ग्राहक संघटनांचा अधिकृत सहभाग निश्चित करण्याबरोबरच निधीचा काही हिस्सा प्रत्यक्ष जनजागृतीसाठी उपलब्ध करून देण्याकडे लक्ष वेधण्यात आले. ग्राहक संरक्षण ही केवळ प्रसिद्धी मोहीम नसून लोकसहभागातून उभी राहणारी चळवळ आहे. त्यामुळे शासनाने अखिल भारतीय ग्राहक पंचायत सारख्या इतर काही अनुभवी ग्राहक संघटनांचा सहभाग सुनिश्चित करून ग्राहक जनजागृती अधिक प्रभावी करण्यासाठी शासन निर्णयात आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी प्रांताध्यक्ष औटी यांनी यावेळी केली.

> "ग्राहक जनजागृती ही केवळ जाहिरातींमधून होत नाही. ती लोकांमध्ये जाऊन, त्यांच्या प्रश्नांना समजून घेत, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनातून घडते. शासनाने जाहिरातींवर होणाऱ्या खर्चाबरोबरच ग्राहक संघटनांच्या अनुभवाचा आणि कार्यकर्त्यांच्या जाळ्याचा उपयोग केला, तर जनजागृती अधिक परिणामकारक होईल आणि प्रत्येक रुपया खऱ्या अर्थाने ग्राहकहितासाठी खर्च होईल."
> **- बाळासाहेब औटी (अध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, मध्य महाराष्ट्र प्रांत)**

# दूषित पाण्यामुळे तीन गाभण मेंढ्यांचा मृत्यू

खालुंब्रे येथील घटना

**■ चाकण (दै. संध्या)**



> "दुषित पाण्याचे नमुने तपासावेत. जबाबदार कंपन्यांवर कारवाई झाली पाहिजे. नुकसानग्रस्त पशुपालकाला आर्थिक भरपाई देण्याची गरज आहे. पशुपालक व ग्रामस्थ यांना न्याय मिळणे अपेक्षित आहे."
> **- अॅड. विशालभाऊ तुळवे, खालुंब्रे**

खेड तालुक्यातील खालुंब्रे हद्दीत कंपन्यांमधून बाहेर पडणाऱ्या दूषित पाण्यामुळे तीन गाभण मेंढ्यांचा विषबाधेने मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली.

सततचा पाऊस, थंडी आणि परिसरातील कंपन्यांमधून बाहेर पडणाऱ्या दूषित पाण्यामुळे ही विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच परिसरातील पर्यावरण प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

या घटनेत अहमदनगर जिल्ह्यातील ढवळपुरी येथील धनगर समाजातील पशुपालक केरबा मारुती शिंगटे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शिंगटे हे मेंढपाळ व्यवसायासाठी आपल्या कळपासह खालुंब्रे परिसरात वास्तव्यास आहेत. परिसरात साचलेले किंवा वाहणारे दूषित पाणी प्यायल्याने त्यांच्या तीन गाभण मेंढ्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. गाभण मेंढ्यांचा मृत्यू झाल्याने केवळ तीन जनावरांचेच नव्हे, तर भविष्यात जन्माला येणाऱ्या कोकरांचे देखील नुकसान झाल्याने त्यांना दुहेरी आर्थिक फटका बसला आहे. शिंगटे यांनी सांगितले की, एकाच वेळी तीन गाभण मेंढ्यांचा मृत्यू होणे हे आमच्यासाठी मोठे संकट आहे. या मेंढ्या आमच्या उपजीविकेचे साधन होत्या. या दुर्दैवी घटनेमुळे आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्रशासनाने यावर तातडीने तोडगा काढावा आणि आम्हांला न्याय द्यावा.

घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे यांनी तातडीने या प्रकरणात लक्ष घातले. त्यांनी पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. संबंधित अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठवून त्वरित पंचनामा करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. बोत्रे यांच्या पाठपुराव्यानंतर पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत मेंढ्यांची पाहणी करून पंचनामा केला. यावेळी तलाठी गणेश पोतदार, विशाल तुळवे आणि शिवाजी बोत्रे यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून आवश्यक नोंदी घेतल्या आहेत.

मृत्यूचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी पुढील तपास आणि आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या तपासातून दूषित पाण्याचा स्रोत आणि कारणीभूत घटक स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

## चाकण भागात महामार्गावर अवजड वाहनांचे बेकायदेशीर पार्किंग

**■ चाकण (दै. संध्या)**

चाकण भागात महिंद्रा व इतर कंपन्यांच्या बाहेर लोडिंगसाठी येणाऱ्या ट्रकचे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणारे बेकायदा पार्किंग वाहनचालकांसाठी गंभीर समस्या बनली आहे. प्रशासनाने या परिसरात नो पार्किंगचे फलक लावले असले, तरी त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून ट्रकचालक आपल्या सोयीनुसार रस्त्यावरच वाहने उभी करत आहेत. या बेकायदा पार्किंगमुळे रस्त्याची रुंदी कमी होत असून वाहतुकीचा वेग मंदावू लागला आहे. दुचाकीस्वार आणि चारचाकी वाहनचालकांना त्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अपघाताचा धोका वाढला असून, चाकण भागातील बऱ्याच मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी नित्याची होऊ लागली आहे. वाहतूक समस्या आता नवीन राहिली नसून अनेक दिवसांपासून हा प्रश्न उभा आहे. संबंधित यंत्रणा आणि वाहतूक पोलिसांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने नियमांना हरताळ फसले जात आहेत. नो पार्किंगचे फलक केवळ शोभेची वस्तू ठरत असल्याची टीका वाहन चालकांकडून होत आहे. वाहतूक सुरळीत राहण्यासाठी व संभाव्य अपघात टाळण्यासाठी चालकांनी निष्काळजीपणा टाळला पाहिजे. अवजड वाहने एका ठिकाणी लावण्यासाठी कंपनीच्या व्यवस्थापनाशी समन्वय साधला पाहिजे. चाकणला महामार्गावरील बेकायदा पार्किंग कायमस्वरूपी बंद होणे गरजेचे आहे.



> "बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडी होत आहे. कामगार व विद्यार्थ्यांचे त्यामुळे अतोनात हाल होत असून, सर्वजण बेजार झाले आहे. वाहतुकीला अडथळा ठरणारी अवजड वाहने व्यवस्थित लावण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत."
> **- संतोषभाऊ लेंडघर, उद्योजक, चाकण**

## शिवाजी विद्यापीठ व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात करार

गणितीय सहकार्यातून संशोधन व नवोपक्रमांना चालना; विद्यार्थी-शिक्षकांना मिळणार नव्या संधी

**■ बारामती (दै. संध्या)**




शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील गणित विभाग आणि तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बारामती येथील गणित विभाग यांच्यात शैक्षणिक सहकार्य, संशोधन आणि ज्ञानविनिमयाला चालना देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक संबंध अधिक दृढ होऊन गणित विषयातील संशोधन आणि नवोपक्रमांना नवी दिशा मिळणार आहे.

या सामंजस्य करारासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. रजनीश कमलाकर कामत, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) ज्योती पी. जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तसेच सामंजस्य करार समन्वयक व गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. टी. गोफणे, प्रा. डॉ. के. डी. कुचे, डॉ. ज्योती खराडे आणि डॉ. सुनील कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य प्रा. डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर, उपप्राचार्य प्रा. डॉ. वाय. आर. मुळे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक व उपप्राचार्य प्रा. डॉ. ए. एस. मगर, कुलसचिव अभिनंदन बी. शहा, गणित विभागप्रमुख एस. आर. पुराणिक तसेच सामंजस्य करार समन्वयक डॉ. जयवंत पताडे, डॉ. प्रकाश फुलारी आणि डॉ. शैला जाधव यांनी या उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेतला.

या कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांकडून संयुक्त संशोधन प्रकल्प, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, शिक्षक व विद्यार्थी देवाणघेवाण, तज्ज्ञांची व्याख्याने, अभ्यासक्रम विकास तसेच विविध शैक्षणिक उपक्रम संयुक्तपणे राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे गणित विषयातील संशोधनाची गुणवत्ता वाढण्यास मदत होणार असून विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांना संशोधन व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. दोन्ही संस्थांमधील ज्ञान आणि संशोधन अनुभवांची देवाणघेवाण झाल्याने नावीन्यपूर्ण संशोधनाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

'गणितीय सहकार्यातून नवोपक्रमांना चालना' या संकल्पनेवर आधारित हा सामंजस्य करार उच्च शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे. या करारामुळे उच्च शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रमाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा. विनायक लष्कर यांना पीएच.डी.प्रदान

**■ बारामती (दै. संध्या)**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांनी अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील प्रा.विनायक लष्कर यांना समाजशास्त्र विषयात पीएच. डी.प्रदान केली. पुणे आणि अहमदनगर शहरातील वडार समुदाय यांच्यातील सामाजिक आर्थिक स्थितीचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. डॉ.भामरे ज्ञानेश्वर काशिनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी प्रबंधाचे काम केले.

विनायक लष्कर हे तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,बारामती, पुणे येथे समाजशास्त्र विभाग प्रमुख आहेत. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'विमुक्त आणि भटक्या जमातींच्या स्वतंत्र अभ्यास केंद्राच्या' स्थापनेवरील तज्ञ समिती सदस्य म्हणून काम केले आहे. ईकोनेट- पुणे, यशदा- पुणे, आणि टाटा समाज विज्ञान संस्था- मुंबई या संस्थांनी भटक्या विमुक्त जाती जमाती संदर्भात केलेल्या संशोधन प्रकल्पामध्ये सल्लागार काम केले आहे. तसेच सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, सोपेकॉम, पुणे आणि प्रयास (साधन आणि संसाधन गट) पुणे, निसदा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, या संस्थांच्या संशोधन प्रकल्पामध्ये संशोधन सहाय्यक म्हणून काम केले आहे. विनायक लष्कर यांनी भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या 'विमुक्त, भटक्या आणि अर्ध-भटक्या जमातींसाठीच्या राष्ट्रीय आयोगाचे तज्ञ समिती सदस्य म्हणून काम केलेले आहे. भटक्या विमुक्त जाती जमाती अभ्यास केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या अभ्यास मंडळावर काम केले आहे. तसेच तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळाचे प्रमुख आणि तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्या परिषदेवर देखील सदस्य म्हणून काम करत आहेत. विनायक लष्कर हे गेल्या २० वर्षापासून भटक्या विमुक्त जाती जमातींच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्नांवर सातत्यपूर्ण काम करत आहे. संशोधन, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकांमध्ये लिखाण, धोरण निर्मिती, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील संमेलने आणि कार्यशाळा यामध्ये सक्रिय सहभागी होऊन भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांना अधोरेखित करण्याचे काम करत आहेत. 'वडार समाज-समाजशास्त्रीय अभ्यास' या त्यांच्या पुस्तकास दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीमार्फत दिला जाणारा २०१५ चा 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार – २०१५' मिळाला आहे. तसेच त्यांच्या 'वडार समाज : समाजशास्त्रीय अभ्यास' या पुस्तकास मातंग साहित्य परिषदेमार्फत दिला जाणारा २०२४ सालचा 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाड्मय पुरस्कार- २०२४' देखील प्राप्त झाला आहे. तसेच त्यांच्या 'विमुक्ती कोलाहल' या काव्यसंग्रहास २०२५ सालचा 'साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वाड्मय पुरस्कार- २०२५' देखील प्राप्त झाला आहे. तसेच भटक्या विमुक्त जाती जमातींच्या उत्थाना संदर्भात करत असलेल्या कार्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील 'युवा गौरव पुरस्कार २०२२' ने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. प्रा.विनायक लष्कर यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, उपप्राचार्य, रजिस्ट्रार, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## निसर्ग फुलणार

**■ कऱ्हाड (दै. संध्या)**

धावपळीच्या आयुष्यात एसटीच्या खिडकीतून बाहेर बघताना किंवा रेल्वेच्या थांब्यावर उभे असताना व्यावसायिक जाहिरातीबरोबर हिरवीगार जंगले, वन्यजीव आणि वसुंधरा वाचवण्याचा संदेशही पाहायला मिळणार आहे. जिल्ह्यातील रेल्वे आणि बस स्थानकांवरही निसर्ग संवर्धनाची चळवळ आकार घेणार आहे. निसर्गाचे महत्त्व सामान्यांच्या दैनंदिन प्रवासाचा भाग बनवण्यासाठी वन विभागाने जोरदार तयारी केली आहे. त्यासाठी सहा कोटींची तरतूद केली आहे. वन, वन्यजीव व पर्यावरणाचे संरक्षणासह वृक्षाच्छादन वाढवण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या व्यापक प्रचारासाठी वन विभागाने सहा कोटींहून अधिकचा निधी वितरित केला आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात प्रचार, प्रसिद्धी व प्रशिक्षण योजनेंतर्गत ती रक्कम मंजूर केली आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांत पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करणे आवश्यक झाले आहे.

# चाकणला रस्त्यातील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा खोळंबा




**■ चाकण (दै. संध्या)**

दमदार पावसामुळे चाकणला महामार्गावर प्रचंड खड्डे पडून रस्त्यांची चाळण झाली आहे. त्यात रस्त्यावर व कडेला साठलेल्या चिखलामुळे दुचाकी घसरून रोज अपघात होत आहेत. चाकण परिसरात गेल्या आठ दिवसांत तब्बल चार निष्पाप नागरिकांचा बळी गेला असून, बुधवारी सकाळी दुचाकी घसरून एका महिलेचा मृत्यू झाला. याशिवाय चाकण परिसरात दररोज प्रचंड वाहतूक कोंडी देखील होत आहे. वाहतूक कोंडीमुळे नागरिक, कामगार, विद्यार्थी यांचे मोठ्या प्रमाणात हाल सुरू आहेत. याबाबत प्रशासनाकडे तक्रार करून देखील कोणतीही दखल घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. चाकण हे एक प्रमुख औद्योगिक क्षेत्र असल्याने या मार्गावरून दररोज हजारो कामगार, नागरिक प्रवास करतात. अवजड वाहने आणि मालवाहू ट्रकची वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते. मात्र, रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून, सर्वच रस्त्यांवर प्रचंड लांबच लांब वाहनांच्या रांगा लागत आहेत. यामुळे कामगारांना व स्थानिक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. प्रमुख मार्ग मृत्यूचे सापळे बनले आहेत. पुणे नाशिक महामार्ग, तळेगाव, चाकण, शिक्रापूर मार्ग, चाकण, आंबेठाण, वासुली फाटा आणि पंचक्रोशीतील सर्वच रस्त्यांवर सर्वत्र प्रचंड खड्डे पडले आहेत. यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून, मोठ्या प्रमाणात रहदारी असल्याने दररोज मोठी वाहतूक कोंडी होत आहे. मोठ्या वाहनांमुळे रस्त्यांवर दुचाकी चालवणाऱ्यांना जीव धोक्यात घालावा लागत आहे. रस्त्यांवर साचलेल्या चिखलाने दुचाकी घसरून दररोज अपघात होत आहेत. यात अनेकांना मोठी दुखापत होते तर काहींचा जीव देखील जात आहे.

शासनाने रस्ते दुरुस्तीकडे लक्ष देण्याची गरज

> चाकण भागात दररोज मोठी वाहतूक कोंडी होत असून, निष्पाप नागरिकांचे बळी थांबले पाहिजेत. प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.
> **- स्वाती लेंडघर, नगरसेविका, चाकण**




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# थोडक्यात पण महत्वाचे

## जून व जुलै महिन्यात ८४ जीवित हानी

मुंबई (दैनिक संध्या) : वीज पडणे, भिंत कोसळणे, झाड पडणे, पुराच्या पाण्यात वाहून जाणे आणि दरड कोसळणे या घटनांमध्ये जून व जुलै महिन्यात जीवितहानीच्या ८४ घटना घडल्या आहेत. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी व पुरापासून बचाव करताना विविध जिल्ह्यात बचाव व मदत कार्य करण्यात आले. यामुळे सरासरी पेक्षा जास्त पाऊस होत असून देखील जीवित व पशुधनाची हानी कमी झाली आहे. जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत विविध दुर्घटनांमध्ये १३७ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ५०५ पशुधनाचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पालघर, पुणे, ठाणे, रायगड, नागपूर, सिंधुदुर्ग गडचिरोली, भंडारा यासह विविध जिल्ह्यांतील पूरपरिस्थितीत एसडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि स्थानिक यंत्रणांनी तातडीने बचावकार्य करून अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले.

## ७ ऑगस्ट पर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम

मुंबई (दैनिक संध्या) : भारतीय हवामान विभागाच्या ७ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजानुसार राज्यातील विविध भागांत पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज आहे. विदर्भातील जिल्ह्यांत सुरुवातीच्या दिवसांत विजांच्या कडकडाटासह वादळी वारे आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यतासह पाऊस तर मुंबई महानगर, कोकण घाट विभागात, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रातील पावसाची शक्यता असून नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी. राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे. वीजांच्या कडकडाटाच्या वेळी सुरक्षित ठिकाणी थांबावे आणि आवश्यक नसल्यास पूरप्रवण व धोकादायक भागात जाणे टाळावे. तसेच धरणांमधून होणाऱ्या विसर्गाबाबत स्थानिक प्रशासनाकडून देण्यात येणारे इशारे याबाबत नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.


## अर्जास मुदतवाढ

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-2026 साठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे. उमेदवारांच्या मागणीचा विचार करून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत 10 ऑगस्ट 2026 रोजी रात्री 11.59 वाजेपर्यंत, तर ऑनलाइन परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत 13 ऑगस्ट 2026 रोजी रात्री 11.59 वाजेपर्यंत वाढविण्यात आली आहे. या परीक्षेद्वारे एकूण 5,707 पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या शुद्धीपत्रकानुसार विविध मागण्यांचा समावेश करून पदसंख्या वाढविण्यात आली आहे.

# सूरत-गुवाहाटीचा प्रवास योगायोग नव्हता

- भाजपच्या संपर्कात राहून पक्षविरोधी कारवाया झाल्या'
- शिंदेंसोबत गेलेले आमदार अपात्रच', सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाचा जोरदार युक्तिवाद

■ मुंबई (दै. संध्या)



शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्हावरील बहुचर्चित वादाच्या सुनावणीत बुधवारी सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी एकनाथ शिंदे आणि त्यांच्यासोबत गेलेल्या आमदारांवर गंभीर आरोप करत, "सूरत आणि गुवाहाटीचा प्रवास हा केवळ योगायोग नव्हता. शिंदे गट भाजपच्या सातत्याने संपर्कात होता. एका मोठ्या राष्ट्रीय पक्षाचा पाठिंबा असल्याचे स्वतः एकनाथ शिंदे यांनी जाहीरपणे सांगितले होते. त्यामुळे त्यांनी केलेली कृती ही स्पष्टपणे पक्षविरोधी कारवाई होती," असा दावा सर्वोच्च न्यायालयात केला. सिब्बल यांनी न्यायालयासमोर संपूर्ण घटनाक्रम मांडताना सांगितले की, शिवसेना पक्षाच्या घटनेनुसार उद्धव ठाकरे यांची पक्षप्रमुख म्हणून निवड झाली होती आणि त्यांनीच एकनाथ शिंदे यांची विधिमंडळ पक्षाचे गटनेते म्हणून नियुक्ती केली होती. तसेच सुनील प्रभू यांची मुख्य प्रतोद (Chief Whip) म्हणून नियुक्ती करून त्याची माहिती विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगालाही देण्यात आली होती.

सिब्बल यांनी सांगितले की, २० जून २०२२ रोजी विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेच्या काही आमदारांनी क्रॉस व्होटिंग केले. त्यानंतर लगेचच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ३१ आमदार प्रथम भाजपशासित गुजरातमधील सूरत येथे आणि नंतर आसाममधील गुवाहाटी येथे गेले.

"हे सर्व आमदार आधी सूरतला आणि त्यानंतर गुवाहाटीला गेले. हा निव्वळ योगायोग असू शकत नाही. ते सर्व एका हॉटेलमध्ये राहिले आणि भाजपच्या सातत्याने संपर्कात होते," असे सिब्बल यांनी न्यायालयात नमूद केले.

या घडामोडीनंतर उद्धव ठाकरे यांनी २१ जून रोजी शिवसेना विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांना गटनेतेपदावरून हटवून त्यांच्या जागी अजय चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली. हा ठराव उपसभापतींकडे पाठविण्यात आला आणि त्यांनी तो स्वीकारल्याचेही सिब्बल यांनी न्यायालयात सांगितले.

न्यायमूर्ती बागची यांनी या ठरावावर सर्व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यावर सिब्बल यांनी, "स्वाक्षऱ्यांची आवश्यकता नव्हती. पक्षघटनेनुसार पक्षप्रमुखांना हा अधिकार आहे. बैठकीची उपस्थिती नोंदही उपलब्ध आहे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयात ही प्रक्रिया वैध मानण्यात आली आहे," असे स्पष्ट केले. सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादात वारंवार स्पष्ट केले की, विधिमंडळ पक्ष आणि राजकीय पक्ष या दोन स्वतंत्र संकल्पना आहेत. विधिमंडळ पक्षाला पक्षाचा गटनेता किंवा मुख्य प्रतोद बदलण्याचा अधिकार नाही. त्यांनी 'सुभाष देसाई' प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला देत, विधानसभा अध्यक्षांनी शिंदे गटाने केलेल्या बदलांना दिलेली मान्यता कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगितले. दहाव्या अनुसूचीतील पक्षांतरबंदी कायद्याचा उल्लेख करत सिब्बल यांनी सांगितले की, शिंदे गटासोबत गेलेले आमदार स्वेच्छेने पक्षविरोधी भूमिका घेत असल्याने ते त्या क्षणापासून अपात्र ठरत होते. जर त्यांना वेळेत अपात्र घोषित केले गेले असते, तर त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेले निर्णय तसेच निवडणूक आयोगाने पक्ष आणि 'धनुष्यबाण' चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णयही कायदेशीरदृष्ट्या टिकला नसता. यावेळी सरन्यायाधीशांनी पक्षघटना, निवडणूक आयोगाच्या नोंदी आणि पक्षातील बहुमत कशा पद्धतीने ठरवले जाते, यासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने पक्षाच्या संविधानातील तरतुदी आणि निवडणूक आयोगाची भूमिका यावरही सविस्तर चर्चा केली. सिब्बल यांनी आपल्या युक्तिवादाच्या शेवटी न्यायालयाला सांगितले की, अशा प्रकारे निवडून आलेले आमदार दुसऱ्या पक्षाच्या मदतीने सरकार बदलत असतील, तर त्याचा लोकशाहीवर गंभीर परिणाम होतो. मतदारांनी एका पक्षाला दिलेला कौल दुसऱ्या राजकीय समीकरणासाठी वापरला जातो आणि त्यामुळे निवडणूक प्रक्रिया व लोकशाही व्यवस्थेवर परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले. या बहुचर्चित प्रकरणातील बुधवारीची सुनावणी संपली असून, गुरुवारी दुपारी पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यावेळी ठाकरे गटाचा उर्वरित युक्तिवाद आणि त्यानंतर प्रतिवादींची बाजू मांडली जाण्याची शक्यता आहे.

### 'निवडणूक चिन्ह पक्षाचे की विधिमंडळ पक्षाचे?'

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती बागची यांनी अत्यंत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करत विचारले की, "निवडणूक चिन्ह हे मूळ राजकीय पक्षाचे असते की विधिमंडळ पक्षाचे?" यावर सिब्बल यांनी उत्तर दिले की, "चिन्ह हे राजकीय पक्षाचे असते. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पक्षाचे अधिकृत पत्र आवश्यक असते. त्यामुळे विधिमंडळ पक्षाला पक्षावर मालकी सांगता येणार नाही."

### नेमकं काय म्हणाले सिब्बल?

'दोन्ही पक्षांनी मूळ पक्षावर दावा केला होता, प्रकरण जेव्हा निवडणूक आयोगात गेलं, तेव्हा निकाल हा फक्त विधीमंडळ पक्षाच्या संख्येवर देण्यात आला का? हे कसं होऊ शकतं? विधीमंडळ पक्ष हा राजकीय पक्षाचा भाग आहे, तो म्हणजे मूळ राजकीय पक्ष नाही, पक्षाची घटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगचा नाही. उद्धव ठाकरे यांना सोडून गेलेल्या आमदारानी ठराव पास केला की एकनाथ शिंदे हे मुख्य नेते आहेत, गोगावले यांची व्हीप म्हणून नियुक्ती केली, काही नेते आणि उपनेते यांची नियुक्ती केली, परंतु मुख्य नेता हे पद पक्षाच्या घटनेतच नाही. पक्षाची घटना योग्य आहे की नाही हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगचा नाही, असा युक्तिवाद या सुनावणीवेळी कपिल सिब्बल यांनी केला आहे.

### युक्तिवादाला शिंदे गटाचे वकील प्रत्युत्तर देतील

शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने कपिल सिब्बल हेच यावेळी पुन्हा युक्तिवाद करणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने आणखी एक वकील युक्तिवाद करणार आहेत. त्यानंतर शिंदे शिवसेनेच्या वतीने मेहता आणि कौल हे युक्तिवाद करतील, त्यानंतर याच्या संदर्भातील निर्णय होईल. कपिल सिब्बल यांनी आज जो काही युक्तिवाद केला, त्या युक्तिवादाला शिंदे गटाचे वकील प्रत्युत्तर देतील. कोर्टातून बाहेर पडताना संजय राऊत यांनी व्हिक्ट्री साईन दाखवलं यावर देखील यावेळी राहुल शेवाळे म्हणाले की,दावा कोणीही करेल, परंतु निर्णय देण्याचा अधिकार हा सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाचा आहे. आज सुप्रीम कोर्टात काय घडणार? याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे. सिब्बल यांच्या युक्तिवादानंतर सरन्यायाधीशांनी त्यांना काही प्रश्न विचारले. “११-अ हे कलम जानेवारी २०१३ मध्ये निवडणूक आयोगाला कळविण्यात आले होते का? तसेच या कागदपत्रावरील स्वाक्षरीची आपण पुष्टी करू शकता का?” असा सवाल न्यायालयाने विचारला.

## १६९८ अलर्ट जारी

■ मुंबई (दै. संध्या)

जानेवारी २०२६ पासून आत्तापर्यंत १६९८ अलर्ट पाठविण्यात आले. तसेच वीज पडणे, अतिवृष्टी आणि भूस्खलनासंदर्भातील २८५ अलर्ट जारी करण्यात आले आहेत, अशी माहिती राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची २३ पथके कार्यरत विभागामार्फत देण्यात आलेल्या माहितीनुसार हवामान खात्याकडून प्राप्त होणाऱ्या पूर्वसूचना आणि रिअल-टाईम अलर्टच्या आधारे स्थानिक प्रशासनाला तात्काळ सूचना देण्यात आल्या तसेच नागरिकांना सतर्क करण्यासाठी इशारे देण्यात आले. राज्यात अतिवृष्टी व पूरपरिस्थितीचा सामना करताना नागरिकांचा जीवित हानीपासून बचाव करण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांची एकूण २३ पथके विविध संवेदनशील जिल्ह्यांमध्ये तैनात करण्यात आली आहेत. यामध्ये एनडीआरएफ १७ आणि ६ पथकांचा समावेश असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित बचाव व मदतकार्य करता आले आहे.

# तोरणमाळचा पर्यटन विकास शाश्वत व नियोजनबद्ध पद्धतीने करून जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित करू : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

■ मुंबई (दै. संध्या)



तोरणमाळचा पर्यटन विकास शाश्वत, नियोजनबद्ध आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करताना तेथील नैसर्गिक वारसा जपत पर्यटकांसाठी आधुनिक व दर्जेदार सुविधा निर्माण करण्यावर राज्य शासनाचा भर राहील, असे प्रतिपादन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याबाबत केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सविस्तर आढावा बैठक पर्यटन मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस आमदार आमश्या पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे (भा.प्र.से.), पर्यटन संचालनालयाचे संचालक विकास पानसरे (भा.प्र.से.), पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, सहसंचालक संतोष जाधव, सहाय्यक संचालक रवींद्र पवार, कार्यकारी अभियंता आकाश चकोर तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे नंदुरबार जिल्हाधिकारी, नाशिक पर्यटन विभागाचे उपसंचालक आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत तोरणमाळ पर्यटन विकास आराखड्याच्या विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तोरणमाळचा पर्यटन विकास नियोजनबद्ध, शाश्वत आणि दर्जेदार पद्धतीने व्हावा, यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या मालकीच्या ११ हेक्टर ५६ आर जागेची तातडीने मोजणी करून तिची चतुःसीमा निश्चित करण्याच्या सूचना नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या नाशिक विभागातील अधिकाऱ्यांनी आवश्यक पाठपुरावा करून संबंधित जागेचे नकाशे व चतुःसीमा एका महिन्याच्या आत निश्चित करावेत, असे निर्देशही पर्यटन मंत्री श्री. देसाई यांनी दिले.

तोरणमाळचा नैसर्गिक, जैववैविध्यपूर्ण आणि पर्यटनदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण वारसा जपत आधुनिक सुविधा, पर्यावरणपूरक विकास, पर्यटन पायाभूत सुविधा आणि पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या विविध घटकांचा समावेश पर्यटन विकास आराखड्यात करण्यात यावा, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणारा प्रस्ताव सर्वंकष, परिणामकारक आणि भविष्यातील पर्यटन विकासाच्या दृष्टीने सक्षम असावा, यावरही बैठकीत भर देण्यात आला.

# आरोग्य विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांचा पदग्रहण समारंभ संपन्न

## संशोधन आधारित उपक्रम व विद्यार्थी केंद्री शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य : कुलगुरु डॉ. व्यंकट गिते

■ नाशिक (दै. संध्या)




आरोग्य शिक्षणात संशोधनावर आधारित उपक्रम, पारदर्शक प्रशासकीय कामकाज व विद्यार्थी केंद्री कामांना सर्वाधिक प्राधान्य देणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाचे नवनियुक्त मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे नवनियुक्त मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांचा पदग्रहण समारंभ विद्यापीठात संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते समवेत मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, डॉ. मिलिंद आवारे, डॉ. यशवंत पाटील, डॉ. अजित फुंदे, डॉ. श्रीचक्रधर मुंघल, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी श्री. बोधिकिरण सोनकांबळे, डॉ. देवेंद्र पाटील, डॉ. अनिता गिते आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाचे नवनियुक्त मा. कुलगुरु डॉ. व्यकंट गिते यांनी सांगितले की, विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदु आहे. विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळावा, तंत्रज्ञान आधारित शिक्षण प्रणालीचा वापर व्हावा यासाठी प्रयत्नशिल राहिल. विद्यापीठात समाजोपयोगी संशोधन होणे गरजेचे आहे त्यासाठी संशोधक विद्यार्थी यांना निधी उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच संशोधनास प्राधान्य मिळावे यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. आरोग्य शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना संवाद कौशल्य आत्मसात करण्यासाठी विविध प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतील जेणेकरुन डॉक्टर व रुग्णांमधील संवाद सुकर होईल. विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय मानांकनात पहिल्या शंभर विद्यापीठाच्या यादीस्थान मिळावे यासाठी विविध संशोधन, समाजोपयोगी आरोग्य जनजागृती उपक्रम व ‘नॅक’ च्या धर्तीवर गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. ते पुढे म्हणाले की, विद्यापीठात सिंगल विन्डो सिस्टम प्रणाली लागू करण्यात येईल ज्याव्दारा विद्यार्थी आपल्या समस्या मांडू शकतील. व्ही.सी. पोर्टल कार्यान्वीत करुन त्याव्दारा ऑनलाईन तक्रारींचा निपटारा करण्यात येईल. कार्यालयीन कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा अवलंब करण्यात येईल. कॉन्फीडन्सी बेस्ड मेडिकल एज्युकेशनवर अधिक भर देण्यात येईल. शैक्षणिक गुणवत्ता अधिक दर्जदार करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक व अभ्यागतांना विविध प्रशिक्षण वर्ग घेण्यात येतील.

आय.आय.टी., इस्त्रो, स्पोर्ट इंस्टिटयुट ऑफ सायन्स सारख्या नामांकित संस्थांसमवेत करार करुन आरोग्य शिक्षण प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी भर देण्यात येईल. आरोग्य शिक्षणासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना कार्यान्वीत आहेत त्याव्दारा विद्यापीठाला निधी मिळावा जेणेकरुन अधिक सक्षम व गुणवत्तपुर्ण शिक्षण देण्यासाठी विद्यापीठ भरारी घेईल. नाशिक येथे होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळयासाठी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांच्या मदतीने आरोग्य विषयक जनजागृती उपक्रम, आपत्ती व्यवस्थापनावर कार्यशाळा, मोटर-सायकल ॲम्ब्युलन्स सर्व्हिस यासारखे उपक्रम राबवून समाजोपयोगी काम करण्यातसाठी विद्यार्थ्यांना प्ररित करण्यात येईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आजही तंत्रज्ञान व कौशल्याधिष्टीत उपक्रमांसाठी प्रतिकुल परिस्थितीचा सामना करावा लागतो त्यासाठी योग्य व्यवस्थापन व मार्गदर्शन मिळण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. विद्यापीठाकडून ई-क्लासरुम सुरु केल्यास एकाच वेळी हजारो विद्यार्थी तज्ज्ञ शिक्षकाकडून मार्गदर्शन घेतील त्याचा भविष्यात मोठा उपयोग होईल. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य चांगले रहावे यासाठी ‘टेलिमानस’ योजनेचा प्रभावी अवलंब करण्यात येईल. विद्यापीठ ही विद्यार्थ्यांची स्वप्न घडवणारी शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेचा भाग म्हणून प्रत्येकाने प्रामाणिक, तत्परता व नियोजनबध्द पध्दतीने काम केल्यास येणाऱ्या काळात विद्यापीठ नव्या उंचीवर नेऊ असे त्यांनी सांगितले. यावेळी मा. कुलगुरु यांच्या मातोश्री श्रीमती शाहुबाई अर्जुनराव गिते यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मा. कुलगुरु यांच्या सुविद्य पत्नी डॉ. अनिता गिते, बंधू भास्कर गिते यांचा विद्यापीठाकडून सत्कार करण्यात आला. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांना ज्ञानदान करणारे व आदर्श व्यक्तीमत्व घडविण्यासाठी मूलमंत्र त्यांचे देणारे त्यांचे आदरणीय शिक्षक व गुरुजनांना सत्कार यावेळी करण्यात आला. डॉ. पुरुषोत्तम दराख, डॉ. श्रीराम कंडी, डॉ. अनुराधा कंडी, डॉ. जे.एस. कंडी, डॉ. मलीक, डॉ. गौरांग शहा, डॉ. पळनीटकर, डॉ. एन.डी.कुलकर्णी, डॉ. पंकज माहेश्वरी, डॉ. प्रविण कुमार वसाडीकर, डॉ. अरविंद गायकवाड, डॉ. अजय बोराळकर, डॉ. किरण पाटोळे, डॉ. स्वप्नाली कदम, डॉ. गणेश जाधव, डॉ. सचिन देवरे, डॉ. अनिल सानप, डॉ. अशोक थोरात आदी गुरुजनांचा मा. कुलगुरु यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी नाशिक ग्रामिणचे पालीस अधिक्षक डॉ. डी.एस. स्वामी, विद्यापीठ शैक्षणिक कक्षाच्या अधिष्ठाता डॉ. स्वाती जाधव, एम.पी.आय.चे डीन डॉ. किरण पाटोळे, नाशिकच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संदीप गुंडरे, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, डॉ. पळनीटकर, डॉ. गौरांग शहा, डॉ. प्रविण कुमार वसाडीकर, डॉ. एन.डी. कुलकर्णी, डॉ. अजय बोराळकर, श्री. आबाजी शिंदे, श्री. संदीप महाजन, श्री. संदीप राठोड, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. परचंडेकर, डॉ. अशोक थोरात, डॉ. अजित फुंदे, डॉ. पंकज माहेश्वरी, श्रीमती सुनिता चांदोरकर, ॲड. शिवाजी मोरे, डॉ. स्वप्नाली कदम, श्री. भास्कर गिते, डॉ. श्रीचक्रधर मुंघल यांनी यावेही मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री यांचे सचिव श्री. विजय उकलगांवकर, नाशिक ग्रामिणचे पालीस अधिक्षक डॉ. डी.एस. स्वामी, मा. उद्योग मंत्री यांचे सचिव डॉ. प्रशांत रुमाले, श्री. अरविंद केंद्र, डॉ. अजय भांडारवार, डॉ. मिनल मोहगांवकर, डॉ. नागोबा, डॉ. सचिन मुंबरे, डॉ. चक्रधर मुंगल, डॉ. किशोर वाणी, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अरविंद केंद्रे, श्री. विजय उकडगावकर, डॉ. विनायक आघाव, श्री. संजय शेरकर, डॉ. गौरांग शहा,, डॉ. अशोक थोरात, डॉ. यशवंत पाटील, डॉ. अजित फुंदे, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अरविंद केंद्रे, डॉ. संतोष केंद्रे, श्री. शैलेश चव्हाण, श्री. सुधीर चौधरी, डॉ. आशिष छाजेड, डॉ. प्रशांत दराडे, डॉ. परचंडेकर, श्री. बाबुराव केंद्रे, डॉ. अनंत शिनगारे, डॉ. दिनकर केकाण, डॉ. शरद घावटे, डॉ. अन्सारी, डॉ. विनायक आघाव, श्री. प्रदीप केंद्रे, श्री. भाऊसाहेब मुंडे, डॉ. प्रविणकुमार वासाडीकर, डॉ. स्वप्नाली कदम यांचा मा. कुलगुरुंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

> “ विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ यांनी नवनियुक्त मा. कुलगुरु यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलसचिव यांनी विद्यापीठाचा मानदंड नवनियुक्त मा. कुलगुरु डॉ. व्यकंट गिते यांच्याकडे सुपूर्द केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले तसेच आभार श्री. देवेंद्र पाटील यांनी मानले. यावेळी विविध शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, आरोग्य क्षेत्रातील मान्यवर, विविध क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, मित्रपरिवार, नातेवाईक व विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यापीठाच्या नवनियुक्त कुलगुरुंचे अभिनंदन केले तसेच मनोगतातून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, विद्यार्थी, शिक्षक व विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित रहावे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### १६६८ हेक्टर जमिनींसह अन्य राज्यांतील जमिनींचा तातडीने ताबा घ्यावा

**पुणे : दैनिक संध्या**

श्री तुळजाभवानी देवीच्या महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मध्य प्रदेशातील भाविकांनी अर्पण केलेल्या जमिनींच्या बेकायदेशीर हस्तांतरणप्रकरणी 'हिंदु जनजागृती समिती'ने पुणे विभागीय आयुक्तांना थेट कायदेशीर इशारा दिला आहे. 'महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम'मधील कलम १८, १९, २१, २२ आणि २२-अ अंतर्गत असलेल्या अधिकारांचा वापर करून देवीच्या नावे असलेल्या सर्व जमिनींचा प्रत्यक्ष ताबा तातडीने मिळवावा; अन्यथा शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरीत्या प्रतिवादी करून उच्च न्यायालयात नवीन जनहित याचिका दाखल करण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे. मंदिराच्या १६६८.१४ हेक्टर जमिनी आणि कोट्यवधी रुपयांच्या दानपेटी घोटाळ्याप्रकरणी हिंदु जनजागृती समितीची जनहित याचिका (क्र. २१/२०१८) मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात प्रलंबित आहे. श्री तुळजाभवानी देवस्थानाच्या हजारो एकर भूखंड घोटाळ्याप्रकरणी विधिमंडळात महसूलमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने २० जुलै २०२६ रोजी पुणे विभागीय आयुक्त श्रीमती शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीला हिंदु जनजागृती समितीच्या वतीने खटला लढवणारे अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी आणि अधिवक्ता उमेश भडगावकर यांनी सविस्तर कायदेशीर नोटीस वजा निवेदन सादर केले. हे निवेदन देताना अधिवक्ता (पू.) सुरेश कुलकर्णी, अधिवक्ता उमेश भडगावकर, तसेच पुणे येथून अधिवक्ता (सौ.) मुग्धा बिवलकर आणि अधिवक्ता (सौ.) सुनंदा येवले उपस्थित होत्या.

### भगवंत नामात एकनिष्ठतेने स्थिर होण्यातच खरी तृप्ती : ह. भ. प. यशोधन महाराज साखरे

**पुणे : दैनिक संध्या**

भगवंताच्या नामाच्या ठिकाणी एकनिष्ठतेने स्थिर झालात, तर त्या एकनिष्ठतेने स्थिर होण्याचा परिणाम म्हणजे खरी तृप्ती प्राप्त होते. तुम्हाला जर तृप्ती प्राप्त करून घ्यायची असेल, तर भगवन्नामाच्या ठिकाणी एकनिष्ठतेने स्थिर व्हायला हवे, असे प्रतिपादन ह.भ.प. यशोधन महाराज साखरे यांनी केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे जंगली महाराज रस्त्याजवळील हॉटेल सेंट्रल पार्क येथे चातुर्मासानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ९ ऑगस्ट पर्यंत हा महोत्सव सुरु असून दररोज सायंकाळी ५.३० वाजता महाराष्ट्राच्या विविध भागांतील नामवंत कीर्तनकारांना ऐकण्याची व यामाध्यमातून स्वरब्रह्माची अनुभूती घेण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. ह. भ. प. यशोधन महाराज साखरे म्हणाले, भौतिक किंवा व्यावहारिक पदार्थांच्या माध्यमातून तृप्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला, तर ती तृप्ती तात्कालिक असते. व्यावहारिक, भौतिक पदार्थांच्या मागे लागून तृप्ती प्राप्त होत नाही. भौतिक पदार्थांतून तृप्ती प्राप्त करून घेणे म्हणजे मूर्खपणाचे लक्षण आहे. यदा-कदाचित तृप्ती प्राप्त झालीच, तरी ती तात्कालिकच असते. जगामध्ये एकमेव शब्दप्रभू म्हणजे माऊली ज्ञानोबाराय असल्याचे सांगत ह.भ.प. यशोधन महाराज साखरे म्हणाले, शब्दप्रभू म्हणजे ज्याच्याकडे शब्द निर्माण करण्याचे आणि त्या शब्दाला अर्थ प्रदान करण्याचे सामर्थ्य आहे. माऊलींच्या शब्दकलेचे वैभव असे आहे की, त्या ठिकाणी अर्थ निर्माण होतो आणि अर्थच माझ्याकरिता शब्द कधी निर्माण होईल याची वाट पाहत असतो. असे माऊलींच्या शब्दांचे सामर्थ्य आहे, असेही त्यांनी सांगितले. महोत्सवाला प्रवेश खुला असून कीर्तनांचा पुणेकरांनी आनंद घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.




### उषा नाडकर्णी, गहिनीनाथ महाराज औसेकर, फत्तेचंद रांका यांना पुरस्कार

**पुणे : दैनिक संध्या**

अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट तर्फे यंदा दि. १० ते १४ ऑगस्ट २०२६ दरम्यान म्हसोबा उत्सवाचे आयोजन मंडईतील बुरूड आळी येथे करण्यात आले आहे. त्यामध्ये भूषण पुरस्कार वितरण समारंभ शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय उत्सवात शिवनाद नृत्य महोत्सव, वेनकॉब पुणे श्री २०२६ ही जिल्हास्तरीय खुली शरीरसौष्ठव स्पर्धा, तब्बल ११०० दिव्यांचा भव्य दीपोत्सव, १ हजार विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य प्रदान, महिलांसाठी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा अशा सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा व धार्मिक कार्यक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती ट्रस्टचे विश्वस्त उपाध्यक्ष निवृत्ती जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला ट्रस्टचे विश्वस्त अध्यक्ष राहुल सूर्यवंशी, राजेंद्र नांगरे, जतिन पांडे, गौतम तांबे उपस्थित होते. निवृत्ती जाधव म्हणाले, यंदाचा व्यापार भूषण पुरस्कार रांका ज्वेलर्सचे संचालक फत्तेचंद रांका, उद्योग भूषण पुरस्कार कायनेटिक इंजिनिअरिंग लिमिटेडचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अजिंक्य फिरोदिया, पत्रकारिता भूषण पुरस्कार ज्येष्ठ संपादक श्रीकांत साबळे, कला भूषण पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, संगीत भूषण पुरस्कार संगीत दिग्दर्शक, गीतकार अविनाश-विश्वजीत, धार्मिक भूषण पुरस्कार विठ्ठल रुक्मिणी देवस्थान पंढरपूरचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ ज्ञानेश्वर महाजार औसेकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. महावस्त्र, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, फळांची करंडी, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे. याशिवाय ज्येष्ठ सिनेनाटय अभिनेते मोहन जोशी आणि मुंबईतील पोलीस उपनिरीक्षक सुमित जव्हेरी यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उत्सवाचा प्रारंभ सोमवार, दि.१० ऑगस्ट रोजी होणार असून सकाळी धार्मिक कार्यक्रम व सायं.५ वाजता शिवनाद नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सायं. ५ वाजता महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन संलग्न पुणे जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटनेच्या मान्यतेने तसेच पिंपरी चिंचवड शरीर सौष्ठव संघटना व बॉडी बिल्डिंग अँड फिजिक्स स्पोर्टस् पुणे यांच्या सहकार्याने वेनकॉब पुणे श्री २०२६ ही ७ वजनी गटातील जिल्हास्तरीय खुली शरीरसौष्ठव स्पर्धा होणार आहे. बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सायं.७ वाजता दीप अमावस्येनिमित्त ११०० दिव्यांचा दीपोत्सव व महाआरती होणार आहे. यावेळी कालीपुत्र कालीचरण महाराज व श्री क्षेत्र दत्तधाम पीठ गंगापूर नाशिकचे योगतपस्वी प.पू. दत्तदासजी महाराज उपस्थित राहणार आहेत. गुरुवार, दि.१३ ऑगस्ट रोजी सायं. ७ वाजता सुमारे १ हजार गरजू विद्यार्थ्यांना एकूण २ लाख ५१ हजार रुपयांचे शालेय साहित्य प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ नंतर महिलांसाठी होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा व चालता बोलता हा कार्यक्रम होणार असून १४ लकी ड्रॉ होणार आहेत.



# जयाद्री खोऱ्यात नागेश्वर धबधब्याचे जलपूजन

**ग्रामस्थांची कऱ्हा निरा नदी जोडो प्रकलपाची मागणी**

■ पुरंदर (दै. संध्या)

राज्यातील विविध जिल्ह्यांत समाधानकारक पावसामुळे जलस्रोत तुडुंब भरू लागले असून, शेतकऱ्यांकडून जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विविध ठिकाणी जलाशयांचे पूजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर जेजुरीजवळील जयाद्री खोऱ्यात कऱ्हा नदीवरील निसर्गरम्य नागेश्वर धबधबा प्रवाही झाल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी भंडारा व गुलालाची उधळण करत जलपूजनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला. या कार्यक्रमाला धनगर स्पेशल ऑर्गनायझेशनचे राज्य युवा अध्यक्ष दीपक कातुरे, नागेश्वर देवस्थानचे अध्यक्ष महादेव बारभाई तसेच अमर बारभाई, श्रीकांत खोमणे, सिद्धार्थ कांबळे, अभिजित कापरे, अमोल सर्ज, अमोल बारभाई, मयूर कापरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांनी शासनाकडे महत्त्वाची मागणी करत जयाद्री खोरा हा दुष्काळग्रस्त परिसर असल्याने कऱ्हा–निरा नदी जोड प्रकल्प प्रभावीपणे राबवून कऱ्हा नदीच्या पात्रात वर्षभर कायमस्वरूपी पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी केली.

ग्रामस्थांच्या मते, या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास मल्हार सागर धरण, नागेश्वर धबधबा आणि ऐतिहासिक पांडेश्वर शिवालय परिसर वर्षभर जलयुक्त राहील.

त्यामुळे धार्मिक व निसर्ग पर्यटनाला मोठी चालना मिळेल, स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील आणि जयाद्री खोऱ्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. जलपूजन कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी साखळी आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले.

तसेच नागेश्वर धबधबा, पांडेश्वर शिवालय आणि परिसराचा पर्यटनस्थळ म्हणून सर्वांगीण विकास करून रस्ते, सुरक्षा व्यवस्था, पार्किंग, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी आणि पर्यटकांसाठी आवश्यक अन्य पायाभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

## ५०० कोटी थकबाकी

■ पुणे (दै. संध्या)

सर्वोच्च न्यायालयाने जाहिरात फलकांच्या (होर्डिंग) थकीत परवाना शुल्काची वसुली करण्याचा मार्ग मोकळा करून दिल्यानंतर तब्बल चार महिने उलटले, तरी महापालिकेकडून प्रत्यक्ष वसुलीची एकही ठोस कारवाई झालेली नाही. केवळ नोटीस बजावण्यापलिकडे प्रशासनाची मजल गेलेली नसून, सुमारे ५०० कोटी रुपयांच्या थकबाकीकडे प्रशासन, सत्ताधारी आणि विरोधकांनीही सोयीस्कर दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या महसूलवाढीसाठी महत्त्वाचा ठरणारा हा निधी अद्याप वसूल न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. महापालिकेने २०१३ मध्ये होर्डिंग परवाना शुल्क १११ रुपयांवरून २२२ रुपये करण्याचा निर्णय घेतला होता. यासोबतच दरवर्षी या शुल्कात १० टक्के वाढ करण्यालाही मान्यता देण्यात आली होती. या वाढीव दराविरोधात होर्डिंग व्यावसायिकांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

## दौंड-पुणे लोकलसाठी राहुल कुल यांची रेल्वेमंत्र्यांसोबत निर्णायक बैठक

■ मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद

■ यवत (दै. संध्या)

पुणे लोहमार्गावर दररोज प्रवास करणाऱ्या लाखो नागरिक, नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी आणि रुग्णांच्या सोयीसाठी आमदार अ‍ॅड. राहुल कुल यांनी सातत्याने सुरू ठेवलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळताना दिसत आहे. या मार्गावर ईएमयू (EMU) लोकल ट्रेन सुरू करण्यासह विविध प्रलंबित मागण्यांबाबत आमदार राहुल कुल यांनी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. ही भेट अत्यंत सकारात्मक ठरली असून, रेल्वेमंत्र्यांनी ईएमयू लोकल सेवेचा प्रश्न युद्धपातळीवर मार्गी लावण्याचे ठोस आश्वासन दिले आहे. यावेळी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे हे देखील विशेष उपस्थित होते. दौंड-पुणे रेल्वे कॉरिडॉरच्या



समस्यांबाबत आमदार अ‍ॅड. राहुल कुल यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास सर्व बाबी आणून दिल्या होत्या. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी स्वतः केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे पत्रव्यवहार करून या मागण्या प्राधान्याने सोडवण्याची शिफारस केली होती. या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे आमदार राहुल कुल यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली आहे

यावेळी आमदार अ‍ॅड. कुल यांनी सध्या धावणाऱ्या जुन्या DEMU / MEMU गाड्यांऐवजी वेगवान ईएमयू लोकल सेवा तातडीने सुरू करावी, ज्यामुळे वेळेची बचत होईल आणि महिला, दिव्यांग तसेच फर्स्ट क्लाससाठी स्वतंत्र डबे उपलब्ध होतील. गाड्यांमध्ये वारंवार होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे होणारा विलंब टाळण्यासाठी त्वरित दुरुस्ती व अद्ययावत यंत्रणा उभी करावी, सकाळी ६:०० वाजता दौंडवरून सुटणारी DEMU गाडी हडपसरऐवजी थेट पुणे जंक्शनपर्यंत नेण्यात यावी, सकाळ - संध्याकाळच्या पीक अवर्समध्ये गाड्यांच्या फेऱ्या वाढवणे आणि सकाळी ८:२० ते दुपारी ५:०० या वेळेत नवीन गाड्या सुरू करण्यात याव्यात, दौंड येथील इलेक्ट्रिक लोको शेडचे काम जलद गतीने पूर्ण करणे. आदी मागण्या केलेल्या आहेत.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत दौंड-पुणे मार्गावरील इलेक्ट्रिक लोको शेडचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच, या मार्गावर ईएमयू (EMU) लोकल सुरू करण्याबाबतची प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण करून निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

> "दौंड - पुणे रेल्वे कॉरिडॉर हा या भागाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा कणा आहे. प्रवाशांना भेडसावणारे प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आमचे नेते मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आमचा सतत पाठपुरावा सुरू आहे. केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनामुळे लवकरच दौंडकरांचा प्रवास अधिक सुखकर आणि जलद होईल."
>
> **- अ‍ॅड. राहुल कुल, आमदार (दौंड विधानसभा)**

## आंतरमहाविद्यालयीन विविध गुणदर्शन तीन दिवसीय स्पर्धा पुण्यात

■ पुणे (दै. संध्या)

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस्, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे व सृजनसभा पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 8 वा प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन विविध गुण्दर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २० ते २२ ऑगस्ट दरम्यान न-हे मानाजीनगर येथील संस्थेच्या संकुलात स्पर्धा होणार आहे. वक्तृत्व, लोकगीत गायन, वादविवाद, पथनाट्य, छोटा ख्याल गायन, नाटयगीत गायन व एकल तबला वादन या प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दुल जाधवर यांनी पत्रकार परिषदेत दिली. युवा पिढीतील सुप्त कलागुणांना वाव देण्याकरीता आयोजित स्पर्धेचे उद्घाटन




गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. उद्घाटनानंतर वक्तृत्व स्पर्धा होणार असून समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय संत परंपरा आणि समरसता, महाभारतातील स्त्रिया : व्यक्तित्व व कर्तृत्व असे विषय आहेत. तर, लोकगीत गायन स्पर्धेत अभंग, भारुड, पोवाडा सादरीकरण देखील याच दिवशी होणार आहे. तसेच स्व. आमदार रमेशभाऊ वांजळे निबंधलेखन स्पर्धा व कै. उद्धवराव तुळशीराम जाधवर वक्तृत्व स्पर्धा ही १ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आली आहे.

अ‍ॅड. शार्दुल जाधवर म्हणाले, वादविवाद व पथनाटय स्पर्धा शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० पासून सुरु होणार आहेत. वादविवाद स्पर्धेकरीता आर्टिफिशियल इंटेलिजन्स - मानवाचा मित्र की प्रतिस्पर्धी?, राजकारणात महत्व कशाला? पक्षनिष्ठा की व्यक्तिगत प्रगती? हे विषय असणार आहेत. तसेच पथनाटय स्पर्धेकरीता से नो टू ड्रग्ज घोषणेपलीकडील कृती या विषयावर सादरीकरण करण्याची मुभा स्पर्धकांना असणार आहे. तसेच, शनिवार, दिनांक २२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छोटा ख्याल गायन, नाटयगीत गायन व एकल तबला वादन स्पर्धा होईल.

## पुणे जिल्ह्यातील पाणी तपासणीत धक्कादायक निष्कर्ष

■ पुणे (दै. संध्या)

जिल्ह्यातील पिण्याचे पाणी ९१.१३ टक्के योग्य आणि गुणवत्तापूर्ण असले, तरी हवेली, शिरूर या दोन तालुक्यांमधील पिण्याच्या पाण्यामधील क्षार जिल्ह्यातील ११ तालुक्यांपेक्षा जास्त असल्याची धक्कादायक बाब भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या (जीएसडीए) रासायनिक तपासणी अहवालात समोर आली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनापुढे मोठे आव्हान निर्माण झाले असून, याबाबत जिल्हा प्रशासनाला कार्यवाही करण्याच्या सूचना जीएसडीए विभागाने केल्या आहेत. राज्य शासनाच्या निर्देशानुसार, मान्सून पूर्व आणि उत्तरेत्तर मान्सून अशा दोन टप्प्यांत भूजल सर्वेक्षण केले जाते. त्यानुसार मान्सून पूर्व प्रक्रियेतील १३ तालुक्यांतून जीएसडीएकडे सन २०२५-२६ या वर्षासाठी तीन हजार ७७५ पाण्यांचे नमुने प्राप्त झाले होते. सर्व पाण्यांचे नमुने प्रादेशिक उपसंचालक यांच्या अंतर्गत मान्यताप्राप्त प्रयोगशाळांमध्ये पाठविण्यात आले. त्यापैकी ३४४० नमुने (९१.१३ टक्के) पिण्यासाठी योग्य, तर ३३५ नमुन्यांचे (८.८७ टक्के) पाणी पिण्यासाठी अयोग्य असल्याचे तपासणी अहवालातून समोर आले आहे. यामध्ये हवेली तालुक्यातून २०९ पाण्याच्या नमुन्यांपैकी ११७ आणि शिरूर तालुक्यातून २१८ पैकी ११५ नमुन्यांच्या पाण्यांमध्ये मापकांनुसार क्षार कमी-जास्त असल्याची नोंद तपासणी अहवालात नमूद केली आहे.

# हातांनी रचले दगड... कष्टाने जपले पाणी... मृत तळ्याला घामातून दिली नवसंजीवनी

■ पुणे (दै. संध्या)

हणबरवाडी आणि निगडीच्या सीमेवर वसलेल्या थोरल्या डोंगरावर जलसंधारणाचा प्रेरणादायी अध्याय लिहिला गेला आहे. सुमारे सहाशे मीटर उंचीच्या या बलाढ्य डोंगरावर ज्येष्ठ मंडळी, तरुण आणि बालचमूंनी एकत्र येत श्रमदानाच्या माध्यमातून वर्षानुवर्षे दुर्लक्षित पडलेल्या मृत तळ्याला नवसंजीवनी दिली. भर उन्हाळ्यात प्रखर उन्हाची तमा न बाळगता डोंगर चढून तळ्याची साफसफाई केली आणि त्याचे पुनरुज्जीवन केले. त्याच कष्टांचे फळ आज पावसाळ्यात दिसून येत असून हा तलाव लाखो लिटर पाण्याने भरून ओसंडून वाहत आहे. थोरल्या



डोंगरावरील हे तळे अनेक वर्षांपासून गाळ, दगड, झाडांचा पालापाचोळा, गवत आणि वेली यांनी पूर्णपणे बुजून गेले होते. त्यामुळे पावसाचे पाणी साठण्याऐवजी वाया जात होते. परिसरातील जलस्रोतांची स्थिती सुधारावी, वन्यजीवांना पाण्याचा आधार मिळावा आणि भूजलपातळी वाढण्यास हातभार लागावा या उद्देशाने प्रत्यक्ष श्रमदान करण्याचा निर्णय घेतला.

उन्हाळ्यात अनेक दिवस सातत्याने मेहनत घेत तळ्यातील गाळ, दगड, झाडांचा पालापाचोळा, वाढलेले गवत आणि वेली हटवल्या. तळ्याचा मूळ आकार पुन्हा तयार करण्यात आला. त्यानंतर तळ्याभोवती दगडी तटबंदी उभारण्यात आली. चंद्रकोरीच्या आकाराच्या या तळ्याची तटबंदी करताना पूर्वेकडील बाजू जाणीवपूर्वक मोकळी ठेवण्यात आली, जेणेकरून डोंगरावरून नैसर्गिकरित्या वाहून येणारे पावसाचे पाणी थेट तळ्यात जमा होईल. जलसंधारणाचा विचार करून केलेले हे नियोजन आज यशस्वी ठरले आहे.

पहिल्याच पावसाळ्यात या तळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून सध्या लाखो लिटर पाण्याचा साठा येथे झाला आहे. या जलसाठ्यामुळे परिसरातील जैवविविधता, वन्यजीव आणि पक्ष्यांना मोठा आधार मिळणार असून भविष्यात भूजलपातळी वाढण्यासही मदत होणार आहे. तलाव भरल्यानंतरही आपले कार्य सुरूच ठेवले आहे. नुकतीच तलावाची पुन्हा साफसफाई करण्यात आली. तलावातील वाढलेले गवत, वेली, पडलेले दगड आणि उरलेला गाळ काढून तलावाची क्षमता कायम राखण्याचे काम करण्यात आले. जलसंधारणाबरोबरच जलस्रोतांचे सातत्याने संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या उपक्रमात सातारा पोलिस दलातील सिद्धनाथ शेडगे, चित्रपट दिग्दर्शक रामकुमार शेडगे, अमोल मोहिते, मीरा शेडगे, ज्ञानेश्वरी शेडगे तसेच अनेक निसर्गप्रेमी आणि बालचमूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सर्वांच्या सामूहिक श्रमातून अशक्य वाटणारे कार्य शक्य झाले असून हा उपक्रम संपूर्ण परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

सिद्धनाथ शेडगे म्हणाले की "उन्हाळ्यात प्रखर उन्हात केलेल्या श्रमदानाचे फळ आज सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे. डोंगरावरील प्रत्येक थेंब अडवण्याचा आमचा प्रयत्न यशस्वी झाला आहे. हा तलाव भरलेला पाहून सर्व मेहनतीचे सार्थक झाल्याची भावना आहे.